रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १०४
www.ramprahar.com
◆ शनिवार, १ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## भारताचे खरे सामर्थ्य त्यांना कळले असेल –पीएम मोदी



**केवडिया :** सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी गुजरातमधील स्टॅच्यु ऑफ युनिटी अर्थात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १८२ मीटर उंचीच्या पुतळ्याला पंतप्रधानांनी अभिवादन केले. राष्ट्रीय एकदा दिनाच्या निमित्ताने त्यांनी जमलेल्या लोकांसोबत एकतेची शपथदेखील घेतली. आपल्या भाषणात पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानवर टीकास्त्र सोडले. त्याचवेळी काँग्रेसलादेखील लक्ष्य केले. ऑपरेशन सिंदूरदरम्यान अवघ्या जगाने हे पाहिले की जर कुणीही भारताकडे वाकड्या नजरेने पाहिले, तर भारत घरात घुसून मारतो. आज पाकिस्तान आणि दहशतवादाच्या हस्तकांना हे कळले असेल की भारताचे खरे सामर्थ्य काय आहे, असे ते म्हणाले तसेच त्यांनी काँग्रेसवर सरकार वल्लभभाई पटेल यांचे विचार विसरल्याचा आरोप केला.

## अंतरंग

न्यायालयाने निर्दोष सोडले, पण मृत्यूने गाठले!/२
स्वस्त किराणाचे आमिष दाखवून फसवणूक; दाम्पत्य अटकेत/६
भारतीय महिला संघावर कौतुकाचा वर्षाव/८

# भरदिवसा घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

### ■ रायगड 'एलसीबी'ची कारवाई; महिलेसह तीन आरोपी गजाआड

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा या राज्यांमध्ये भरदिवसा घरफोडी करून चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (एलसीबी) पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यात एका महिलेचा समावेश आहे.



आरोपींकडून १५ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. त्याचप्रमाणे बंदुकीच्या २४ गोळ्यादेखील जप्त करण्यात आल्या आहेत, तर दोन फरारी आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत, अशी माहिती रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी शुक्रवारी (दि. ३१) पत्रकार परिषदेत दिली.

या प्रकरणातील आरोपी शाहनवाज इकराम कुरेशी (वय ५०), हिना शाहनवाज कुरेशी या दोघांना उत्तर प्रदेशमधील सिकंदराबाद जिल्ह्यातील बुलंदशहर येथून आणि शमीम इस्लाम कुरेशी (वय ४२) याला रायगड जिल्ह्यातील माणगाव येथून अटक करण्यात आली आहे, तर नौशाद इकराम उर्फ इमरान उर्फ इकरामुद्दीन कुरेशी, एहसान (दोघेही रा. सिकंदराबाद, उत्तर प्रदेश) हे आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींनी रायगड, रत्नागिरी, सातारा जिल्ह्यांमध्ये केलेल्या १० गुन्ह्यांची कबुली दिली आहे. या टोळीने उत्तर प्रदेश आणि हरियाणा राज्यांमध्येदेखील घरफोडी केल्या आहेत. मुख्य आरोपी शाहनवाज कुरेशी याच्याविरुद्ध उत्तर प्रदेश व हरियाणा या दोन राज्यांतील विविध पोलीस ठाण्यांमध्ये २३ गुन्हे दाखल आहेत.

> *रायगड पोलिसांनी 'रायगड दृष्टी' व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट हा नवीन डिजिटल उपक्रम सुरू केला आहे. या माध्यमातून नागरिकांनी परिसरातील मटका जुगार, अवैध दारू व्यापार, अमली पदार्थ आणि इतर बेकायदेशीर कृत्यांबद्दल तक्रारी नोंदवाव्यात तसेच रायगड दृष्टी व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट नंबर ७६२००३२९३१ येथे संपर्क साधावा.*
>
> **–आंचल दलाल, पोलीस अधीक्षक, रायगड**

रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात गेल्या काही महिन्यांत दिवसा घरफोडी करण्याचे प्रमाण वाढले होते. यातील आरोपींना अटक करण्यासाठी पोलीस तपास करत होते. यातील एक आरोपी शाहनवाज कुरेशी हा उत्तर प्रदेशातील राहणारा असल्याची माहिती पोलीस हवालदार अमोल हंबीर यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांची दोन पथके तयार करून उत्तर प्रदेशात पाठविण्यात आली. या पथकाने शाहनवाज कुरेशी, हिना कुरेशी यांना उत्तर प्रदेशमधून अटक केली. त्यांनी दिलेल्या माहितीवरून शमीम कुरेशीला माणगाव येथून अटक करण्यात आली.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, मानसिंग पाटील, उपनिरीक्षक लिंगाप्पा सरगर, हवालदार अमोल हंबीर, प्रतिक सावंत, श्यामराव कराडे, रवींद्र मुंढे, अवाय पाटील, सचिन वावेकर, अक्षय आधव, रेखा म्हात्रे, सुदीप पहेलकर, शिपाई अक्षय जगताप, मोरेश्वर ओमले, लालासो वाघमोडे, बाबासाहेब पिंगळे, ओंकार सोंडकर, रोहा पोलीस ठाण्याचे शिपाई प्रशांत लोहार यांनी कामगिरी केली.

# वाढत्या घनकचरा समस्येवर आवश्यक कार्यवाही करा

### आमदार प्रशांत ठाकूर यांची सिडकोकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील वाढत्या घनकचरा समस्येच्या पार्श्वभूमीवर आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोकडे निवेदनाद्वारे केली आहे. पनवेल परिसरातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये कचरा व्यवस्थापनाची समस्या तीव्र होऊ नये यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना दिलेल्या निवेदनात तत्काळ उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.



आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल तालुक्यातील एकूण ७१ ग्रामपंचायतींपैकी १०पेक्षा जास्त ग्रामपंचायती या सिडको अधिसूचित क्षेत्रात आणि ४०हून अधिक ग्रामपंचायती नैना अधिसूचित क्षेत्रात आहेत. नियोजन प्राधिकरणामार्फत विविध बांधकामांना परवानगी देतेवेळी विकास शुल्काची आकारणी करण्यात येते तसेच सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनची खात्री केल्यानंतरच भोगवटा प्रमाणपत्र दिले जाते. सिडको व नैना या नियोजन प्राधिकारणाकडील विविध विकासकामांमुळे अधिसूचित क्षेत्रातील निवासी, औद्योगिक व वाणिज्यिक आस्थापनांची मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. अधिसूचित क्षेत्रातील वाढत्या विकास कामांमुळे पर्यायाने नागरी लोकसंख्येमध्ये झपाट्याने वाढ होत आहे तसेच दैनंदिन रोजगारासाठी स्थलांतरित होणारी संख्या ही जास्त आहे. त्यामुळे अधिसूचित क्षेत्रातील निवासी, वाणिज्यिक, व औद्योगिक आस्थापनांकडून होणारी कचरा निर्मिती ही प्रचंड आहे. सबब, अधिसूचित क्षेत्रातील ग्रामीण हद्दीमध्ये कचऱ्याचे व्यवस्थापन करणे ही अत्यंत गरजेची बाब झाली आहे.

सद्यस्थितीत ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत कचरा व्यवस्थापन हाताळले जात आहे, पण ग्रामपंचायतीमार्फत होणारे कचरा व्यवस्थापन हे पुरेशा आर्थिक तरतुदी व संसाधनाअभावी आदर्श कचरा व्यवस्थापन होत नसल्याचे यापूर्वी वारंवार निदर्शनास आलेले आहे. सध्या ग्रामपंचायतीमार्फत ग्रामीण हद्दीतील कचऱ्याचे संकलन केले जात आहे. तथापि, शास्त्रीयदृष्ट्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जात नाही तसेच कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे व चालवणे याकरिता ग्रामपंचायतीकडे आवश्यक निधी, मनुष्यबळ साधन सामुग्री व तांत्रिक सुविधा यांची कमतरता आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले आहे.

पनवेल ग्रामीण हद्दीतील सिडको नैना अधिसूचित क्षेत्रात निर्माण होणारा कचरा, सिडकोकडील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पामार्फत प्रक्रिया करणे आवश्यक आहेच, पण या कचरा व्यवस्थापनाकरिता लागणारा प्रक्रिया खर्च देण्यास ग्रामपंचायती सक्षम नाहीत तसेच कचरा निर्मिती ते सिडकोकडील सद्यस्थितीतील कार्यरत कचरा प्रक्रिया केंद्र याकरिताही येणारा वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणात येणार आहे व याकरिता ग्रामपंचायतीकडे पुरेशी आर्थिक तरतूद नाही. **(पान २ वर..)**

## निवडक

### बच्चू कडू, राजू शेट्टींसह दोन हजार आंदोलकांवर गुन्हा दाखल

**नागपूर :** येथील आंदोलनात सलग २४ तास नागपूर–हैदराबाद महामार्गावर चक्का जाम करत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था विस्कळीत केल्याने पोलिसांनी माजी राज्यमंत्री आमदार बच्चू कडू आणि राजू शेट्टी यांच्यासह सुमारे दोन हजार आंदोलकांवर गुन्हा दाखल केला आहे. कोर्टाचे आदेश धुडकावल्याने कारवाई झाली.

### संजय राऊत यांच्या प्रकृतीत बिघाड; दोन महिने घेणार ब्रेक'

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खासदार संजय राऊत प्रकृतीच्या कारणावरून दोन महिने सक्रिय राजकारणापासून दूर राहणार आहेत. त्यांनी स्वतः पत्रक काढत ही माहिती दिली असून त्यामुळे चर्चांना उधाण आले आहे. निवडणूक आयोगाविरोधात विरोधकांनी १ नोव्हेंबर रोजी मोर्चाचे आयोजन केले आहे, मात्र या मोर्चात आता राऊत यांची कमी जाणवेल. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राऊत यांना लवकर बरे व्हा, असे सोशल मीडियातून म्हटले आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आज पनवेलमध्ये संगीत मॅरेथॉन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शनिवारी (दि. १) उत्कर्ष संगीत मैफिल प्रस्तुत मराठी आणि हिंदी सुमधूर ७५ गाण्यांचा बहारदार कार्यक्रम अर्थात संगीत मॅरेथॉन पनवेलमध्ये होणार आहे.

गायक गोपाळ पाटील यांच्या संकल्पनेतून हा भव्य सांगीतिक कार्यक्रम पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शनिवारी सकाळी ११.३० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सलग रंगणार आहे. या कार्यक्रमात पाटील हे स्वतः ७५ गाण्यांचे सादरीकरण करणार असून उरण, पनवेल आणि नवी मुंबईतील ७५ गायकांचाही सहभाग लाभणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर हे राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देणारे म्हणून ओळखले जातात. गेल्या पाच दशकाहून अधिक काळ त्यांनी सामाजिक कार्याची अखंड परंपरा जपली असून हे कार्य त्यांच्याकडून अखंडपणे सुरूच आहे. यंदा त्यांनी आपल्या वयाच्या ७५व्या अर्थात अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. त्या निमित्ताने कीर्तन महोत्सव, भजन स्पर्धा, रक्तदान शिबिर, शिधा वाटप, विविध क्रीडा स्पर्धा, नाट्य महोत्सव, वक्तृत्व स्पर्धा अशी विविध समाजोपयोगी उपक्रम झाले असून पूर्ण वर्षभर अनेक सामाजिक कार्यक्रम होणार आहेत. त्याच अनुषंगाने उत्कर्ष संगीत मैफिल प्रस्तुत ७५ गाण्यांची संगीत मॅरेथॉन होणार आहे. या सामाजिक उपक्रमांच्या मालिकेतच संगीत मॅरेथॉन हा सांस्कृतिक व संगीतमय कार्यक्रम पनवेलकरांसाठी एक सुरेल मेजवानी ठरणार आहे.

## मोंथा वादळात १२ जणांचा मृत्यू

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

मोंथा चक्रीवादळाने केवळ मच्छीमारच नव्हे, तर सामान्य नागरिकांचेही मोठे नुकसान केले आहे. या वादळाचा सर्वात मोठा तडाखा तेलंगणाला बसला आहे. 'मोंथा'मुळे आंध्र प्रदेश, ओडिशा, तामिळनाडू आणि संपूर्ण तेलंगणा राज्यात आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला आहे.

या विनाशकारी नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. तेलंगणातील जुन्या वारंगल जिल्ह्यातच आठ जणांचा मृत्यू झाला आहे. हणमकोंडा जिल्ह्यातील इनवेलु येथे पती–पत्नी पुराच्या पाण्यात वाहून गेले. त्यांचा अद्याप शोध लागलेला नाही. दरम्यान, या वादळामुळे प्रशासन सतर्क झाले असून सखल भागातील लोकांना बाहेर काढून मदत छावण्यांमध्ये हलवण्यात आले आहे.



## पनवेलच्या आकुर्लीत विकासकामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली व त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आकुर्ली ग्रामपंचायतीसह परिसरात ७५ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचा शुभारंभ शुक्रवारी (दि. ३१) करण्यात आला. भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते या कामांचे भूमिपूजन झाले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विकासकामांना गती मिळत आहे. त्यानुसार त्यांच्या २० लाख रुपयांच्या जिल्हा परिषद सेस फंडातून आकुर्ली येथील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण, २० लाख रुपयांच्या आमदार निधीमधून आकुर्ली ग्रामपंचायतीमधील अपेक्षा कॉम्प्लेक्सपासून चिमाजी गायकवाड यांच्या घरापर्यंत गटार व रस्ता तयार करणे, १० लाख रुपयांच्या जिल्हा नियोजन निधीमधून आकुर्लीमध्ये अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण, १५ लाख रुपयांच्या जिल्हा नियोजन निधीमधून आकुर्ली नदीला संरक्षण भिंत बांधणे तसेच १० लाख रुपयांच्या आमदार निधीमधून आकुर्ली ग्रामपंचायत येथे साकव बांधण्यात येणार आहे. या कामांचा शुभारंभ भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाला. **(पान २ वर..)**

## अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे १२वे पर्व रंगणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे यंदा १२वे पर्व रंगणार आहे. त्या अंतर्गत राज्यातील प्राथमिक केंद्रांच्या प्राथमिक फेरीला ६ नोव्हेंबरपासून प्रारंभ होणार आहे.

### ६ नोव्हेंबरपासून प्राथमिक फेरी

राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा
गौरव रंगभूमीचा...!

नाट्यचळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा अविरत राहावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. देखणे व नेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ या स्पर्धेची वैशिष्ट्ये आहेत. स्पर्धेत नवनवीन संकल्पना आणि बहारदार एकांकिका सादर होत असल्याने स्पर्धेचा आवाका वाढला आहे.

स्पर्धेच्या अंतिम फेरीतील प्रथम क्रमांकप्राप्त एकांकिकेस एक लाख रुपये, प्रमाणपत्र आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय ७५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्हे, तृतीय ५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्हे, उत्तेजनार्थ दोन बक्षिसे प्रत्येकी १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह तसेच लक्षवेधी एकांकिकेला ३० हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्हे, उत्कृष्ट विनोदी एककांकिकेला २० हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह आणि इतरही वैयक्तिक पारितोषिके देऊन कलाकारांना गौरविण्यात येणार आहे.


स्पर्धेतील सोलापूर केंद्राची प्राथमिक फेरी ६ नोव्हेंबरला, कोल्हापूर ७ नोव्हेंबर, रत्नागिरी ८ नोव्हेंबर, नाशिक १५ नोव्हेंबर, जळगाव १६ नोव्हेंबर, पुणे २२ व २३ नोव्हेंबर, रायगड २६ व २७ नोव्हेंबर आणि मुंबई व ठाणे केंद्रांची प्राथमिक फेरी २८, २९ व ३० नोव्हेंबर रोजी नियोजित केंद्रांवर होईल. त्यानंतर महाअंतिम फेरी ५, ६, ७ डिसेंबर रोजी पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात रंगेल.



# रायगडात खराब हवामानाचा मासेमारीला फटका

**अलिबाग : प्रतिनिधी**

खराब हवामानाचा मोठा फटका मासेमारीला बसला आहे. रायगड जिल्ह्यातील खोल समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सुमारे तीन हजार बोटी समुद्रकिनाऱ्यावर परत आल्या आहेत. मासेमारी ठप्प झाल्याने मासळीचे दर कडाडले असून सर्वसामान्यांच्या आवाक्याच्या बाहेर गेले आहेत. मासळीचा तुटवडा जावणवत असल्याने खवय्यांच्या खिशाला चाट बसते आहे.



रायगड जिल्ह्यात एकूण ३ हजार ५०० मासेमारी बोटी नोंदणीकृत असून, यापैकी बहुतेक बोटी सध्या किनाऱ्यावर परतल्या आहेत. उर्वरित बोटींच्या सुरक्षित परतीसाठीही प्रशासन आणि बंदर विभाग सतत संपर्कात आहे. चक्रीवादळाचा इशारा मिळताच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क झाली आहे. मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचे आवाहन करण्यात आले असून, स्थानिक ग्रामपंचायती, सागरी सुरक्षा पथक आणि पोलिस दल यांना सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चक्रीवादळामुळे सागरी लाटांची तीव्रता वाढल्याने मच्छीमारांनी खोल समुद्रातील मासेमारी पूर्णपणे थांबवली असून, किनाऱ्यावरील गावांमध्ये सतर्कतेचे वातावरण आहे. प्रशासनाकडून हवामान स्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

यावर्षी पावसाळा लवकर सुरू झाल्याने मच्छीमार बांधवांना मासेमारी लवकरच बंद करावी लागली. त्यानंतरही अनेकदा वादळामुळे खोल समुद्रातील मासेमारी ठप्प होती. यामुळे मच्छीमार बांधवांचा हंगाम वाया गेला असून, ते आर्थिक संकटात सापडले आहेत.

गेले काही दिवस खोल समुद्रातील मासेमारी बंद झाल्याने मच्छीमार बांधवांनी आपल्या बोटी किनाऱ्याला लावल्या आहेत. दुसरीकडे हिवाळ्याचे दिवस जवळ आल्याने मासळी समुद्राच्या तळाशी जाण्यास सुरूवात झाली आहे. याचाही मत्स्यव्यवसायावर परीणाम झाला आहे. त्यामुळे ताजी मासळी बाजारातून आणि सामान्यांच्या ताटातून गायब झाली आहे.

# पाथरज जिल्हा परिषद गटातील कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पाथरज जिल्हा परिषद गटांमधील विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. कर्जत ग्रामीण मंडल अध्यक्ष दिनेश रसाळ यांच्या पुढाकाराने या सर्व कार्यकर्त्यांचा भाजप मधील पक्ष प्रवेश सोहळा माथेरान येथे झाला.

कर्जत तालुक्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आले असल्याने प्रत्येकाचे लक्ष त्याकडे लागले आहे. त्यातच कर्जत ग्रामीण मंडल अध्यक्ष दिनेश माधव रसाळ यांच्या नेतृत्वाखाली पाथरज जिल्हा परिषद गटांमधील कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.हा पक्ष प्रवेश सोहळा माथेरान येथे झाला असून पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थितीत या सर्व कार्यकर्त्यांनी भाजप मध्ये प्रवेश केला.

त्यावेळी जिल्हा अध्यक्ष कोळी यांच्यासह जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, जिल्हा चिटणीस नितीन कांदळगावकर, जिल्हा ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजेश भगत,माथेरान माजी उप नगराध्यक्ष आकाश चौधरी,कर्जत ग्रामीण मंडल चिटणीस काशीनाथ रसाळ आदी उपस्थित होते.हे सर्व पक्ष प्रवेश मंडल अध्यक्ष दिनेश रसाळ यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आणि पक्षप्रवेश किरण रसाळ, निलेश रसाळ, सोमनाथ रसाळ यांच्या माध्यमातून झाले.या पक्ष प्रवेश सोहळ्याचे वैशिष्ट म्हणजे पाथरज या आदिवासी भागातील कार्यकर्ते भाजप मध्ये प्रवेश करण्यासाठी माथेरान येथे पोहचले होते.

भारतीय जनता पार्टीमध्ये युवक कार्यकर्ते योगेश शेंडे, दिनेश भगत, गुरुनाथ दरोडा, सुरज कांबडी, रोहन हिंदोळा, निलेश पादिर, रोशन हिंदोळा, प्रभाकर सांबरी, रोशन भगत, निखिल सांबरी, भीमा हिंदोळा, गणेश शेंडे, चंद्रकांत पारधी, सुनील शेंडे, सुरेश शेंडे, आकाश सांबरी, राजेंद्र शिंगवा, शरद शेंडे, सचिन पादिर रामचंद्र सराई, किरण साबरी, दीपक सांबरी, केतन ठोंबरा, दिवेश कांबडी, हिमेश कांबडी, करण हिंदोळा, रोहित हिंदोळा, वसंत शेंडे, दिलीप शेंडे, विशाल पादिर, आदेश पारधी, ऋतिक शेंडे, युवराज पारधी, शंकर हिंदोळा, देवराम सांबरी, अनिल शेंडे, प्रेम पारधी, अविनाश हिंदोळा, जगदीश सांबरी, विकास कांबडी, धीरज सांबरी सुरेश शिंदोळा हरीश सांबरी, राहुल हिंदोळा, रमेश शिंगवा, अनिल शेंडे, पिंटू सांबरी, गणेश शेंडे, अनंता शेंडे, मालू शिंगवा, ऋतिक शिंगवा, ओम सांबरी, अशोक शिंगवा, अंकुश शिंगवा, अनिल शेंडे, गुरुनाथ हिंदोळा, रोशन हिंदोळा, चंदर हिंदोळा, आदेश हिंदोळा तुषार पादिर, जीवन पादिर, देवराम पाटील, शांताराम निरगुडा, भरत कांबडी, राजेश पादिर, मोतीराम सराई, पदू हिंदोळा, अंकुश हिंदोळा, चंद्रकांत सांबरी, अल्पेश भगत यांनी प्रवेश केला.

# न्यायालयाने निर्दोष सोडले, पण मृत्यूने गाठले!

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चोंढी येथे पूर्व वैमनस्यातून झालेल्या जीवघेण्या हल्ला प्रकरणात अलिबाग सत्र न्यायालयाने गुरुवारी (दि.३०) २१ जणांना दोषी ठरवत सर्वांना सात वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. चार जणांना निर्दोष सोडले. निर्दोष मुक्तता केलेल्या चार जणांपैकी नितेश गुरव याचे न्यायालयातून घरी पोहचताच निधन झाले. न्यायालयाने निर्दोष सोडले, परंतु मृत्यूने त्याला गाठले. न्यायालयाने निर्दोष सोडल्याचा आनंद नितेश जास्त काळ घेऊ शकला नाही.

अलिबाग तालुक्यातील चोंढी येथे २ जुलै २०१३ रोजी पूर्ववैमनस्यातून दिलीप भोईर यांच्यासह २५ जणांनी विटेक कॉम्प्युटर इन्स्टीस्टूटवर हल्ला केला होता. या प्रकरणी मांडवा पोलीस ठाण्यात २५ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याचा अलिबाग सत्र न्यायालयाने गुरुवारी निकाल दिला. या गुन्ह्यातील २५पैकी २१ जणांना न्यायालयाने दोषी ठरवत, सात वर्ष सक्तमजुरी आणि तीन हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली, तर चार जणांना पुरव्याअभावी निर्दोष सोडले. यात नितेश गुरव याचा समावेश होता. गेल्या काही दिवसांपासून तो आजारी होता, अशी माहिती पोलिसांनी दिली.

### दिलीप भोईर रुग्णालयात

या प्रकरणात अलिबाग सत्र न्यायालयाने २१ जणांना दोषी ठरवत सात वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. त्यातील जि.प.चे माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर, गणेश म्हात्रे, जयवंत साळुंखे, अशोक थळे यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. उर्वरित १७ आरोपींची रवानगी तळोजा येथील कारागृहात करण्यात आली आहे.

# गरिबांसाठी एलआयसीची शंभर रुपयांची बचत योजना

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

गुंतवणूक व बचत याचे समीकरण गरिबांच्या स्वप्नातही नसते. कारण कमाई एवढी असते जी कमीच पडते. त्यामुळे गरिबांसाठी आता एलआयसीने शंभर रुपयाची योजना सुरू केली असल्याची माहिती पत्रकार परिषदेत एलआयसी म्युच्युअल फंड चे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी आर.के. झा यांनी दिली. एलआयसी एम एफ कन्झम्पशन फंड नावाची नवीन योजनेची घोषणा करत झा म्हणाले, लोकांच्या वाढत्या खर्चामुळे आणि मागणीमुळे फायदा मिळवणाऱ्या कंपन्यांमध्ये एल आय सी आपले पैसे गुंतवणार आहे. रोजच्या वापरातील वस्तू बनवणाऱ्या साबण, कपडे, गाड्या अशा कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणार आहे. भारताची अर्थव्यवस्था वाढत असल्यामुळे आणि लोकांचे उत्पन्न वाढल्यामुळे उपभोग क्षेत्रात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. हा फंड ३१ ऑक्टोबर पासून गुंतवणुकीसाठी खुला राहील. किमान गुंतवणूक एकदम मोठी रक्कम पाच हजार आणि एसआयपीद्वारे दररोज किंवा दर महिन्याला किमान शंभर रुपयेपासून गुंतवणूक करता येईल.

# नवी मुंबईत एकता दौड; युवावर्गाचा उत्स्फूर्त सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

भारताचे पहिले उपपंतप्रधान लोहपुरुष वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी, नवी मुंबई यांच्या वतीने घनसोली येथे एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नागरिकांचा विशेषतः युवा वर्गाचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. राज्याचे वनमंत्री नामदार गणेश नाईक यांनी एकता दौडचा शुभारंभ केला. या एकता दौडमध्ये माजी खा. संजीव नाईक, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ.राजेश पाटील, शशिकांत राऊत, घनश्याम मढवी,शंकर मोरे, प्रकाश मोरे, निकेतन पाटील, विजय वाळुंज, शिरीष पाटील, राजेश मढवी, प्रताप महाडिक , सुदर्शन जिरगे,रंजना वानखेडे सहभागी झाले होते.



भारत माता की जय असा जयघोष करीत पाम बीच रोड घणसोली येथून एकता दौडची सुरुवात झाली. महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक, युवती आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारताचा संकल्प साकार होतो आहे. वल्लभभाई पटेल यांनी दिलेला एकता आणि अखंडतेचा संदेश युवकांमध्ये रुजवण्यासाठी राज्यभर एकता दौडचे आयोजन करण्यात आल्याची माहिती वनमंत्री नाईक यांनी दिली. भारत सर्वार्थाने प्रगती करत असून हे 'विश्वचि माझे घर' या उक्तीप्रमाणे जगाचे नेतृत्व देखील करीत असल्याचे वनमंत्री नाईक म्हणाले. देशाची एकता आणि अखंडतेसाठी वल्लभभाई पटेल यांनी केलेला आग्रह, निग्रह आणि कार्य यामुळेच त्यांना लोहपुरुष ही उपाधी मिळाली. त्यांनी नेहमीच माणुसकी धर्माचा सन्मान केला.

# वीज वितरण कंपनीकडून वृक्षतोड

## विधी महाविद्यालयाची ऊर्जामंत्र्याकडे तक्रार

**माणगाव ; प्रतिनिधी**


पर्यावरण संरक्षणाचे महत्व अधोरेखित करत शासन दरवर्षी झाडे लावा, झाडे जगवा असा संदेश देत असताना माणगावमध्ये याच घोषणेला हरताळ फासणारी घटना समोर आली आहे. माणगाव येथील वीज वितरण कंपनीने कोणतीही पूर्वसूचना वा संमती न घेता, अशोक दादा साबळे विधी महाविद्यालयाच्या आवारातील तब्बल २५ वर्षांपूर्वीची पाम जातीची तीन प्रचंड झाडे अमानुषपणे तोडल्याने संताप व्यक्त होत आहे.

या प्रकरणी महाविद्यालय प्रशासनाने ऊर्जा मंत्री, वन विभाग आणि माणगाव नगरपंचायत यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असून, संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. महाविद्यालय प्रशासनाच्या



म्हणण्यानुसार, शहरातील अनेक भागात व महामार्गालगत वीज तारांवर झुकलेल्या झाडांच्या फांद्या असूनही, त्या न छाटता महाविद्यालयातील आरोग्यदायी झाडे तोडण्यात आली, ही बाब अत्यंत धक्कादायक आहे.शासन एकीकडे वृक्षसंवर्धनाचा नारा देत असताना, वीज कंपनीकडून अशा निर्दयी वृक्षतोडीचे प्रकार घडणे हे पर्यावरणावरील अपराधच आहे, अशी प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# निसर्गरम्य माथेरान पुन्हा हरवले धुक्यात! पर्यटकांसाठी पर्वणी



**माथेरान : बातमीदार**

ऑक्टोबर महिना संपला तरी सुद्धा माथेरान पर्यटन स्थळ अजूनही धुक्यात हरवलेले दिसत आहे.सतत होत असलेली रिमझिम आणि त्यामुळे वातावरणात निर्माण झालेला गारवा मात्र येणाऱ्या पर्यटकांना येथे आल्हाददायक वातावरणाची अनुभूती देत आहे.सध्यादिवाळी हंगामाचा शेवटचा विकेंड सुरू असून मोठ्या प्रमाणावर दाखल झालेले पर्यटक या आल्हाददायक आणि धुक्यात हरवलेल्या माथेरान पर्यटनस्थळाच्या निर्सगाची अनुभूती घेताना दिसत आहेत.उंच गिरीशिखरवर वसलेल्या निसर्गरम्य माथेरान पर्यटनस्थळी यंदाच्या पावसाचा मुक्काम वाढलेला दिसत असून माथेरान पर्यटनस्थळी परतीच्या पावसाने आणि सध्या वातावरणातील बदलामुळे संपूर्ण माथेरान शहर धुक्यात हरवलेले दिसत आहे.येथील संपूर्ण रस्ते येथील पॉईंट परिसर धुक्याने अच्छादलेले नजरेस पडत आहेत. सध्या शेवटचा दिवाळी पर्यटन हंगाम सुरू असून येथे पर्यटक मोठ्या प्रमाणावर आले आहेत.पर्यटकांना या ठिकाणी रिमझिम पाऊस आणि धुक्यात हरवलेले माथेरान पर्यटनस्थळ तसेच गारेगार वातावरणाची अनुभूती येथे मिळत आहे.त्यामुळे येथे येणारा मुंबई-पुण्याचा पर्यटक बेहद खुश होऊन या निसर्गरम्य पर्यटनस्थळाचा मनमुराद आनंद घेत आहे.काही पर्यटकांना आपण काश्मीरला तर आलो नाही ना असं वाटत आहे. नोव्हेंबर महिन्याच्या सुरवातीला माथेरान पर्यटनस्थळ धुक्यात हरवलेले पहावयास मिळत आहे.जर का बाराही महिने माथेरान पर्यटन स्थळ असेच आल्हाददायक,धुक्यात हरवलेले,गारेगार वातावरण राहिले तर या ठिकाणी दररोज पर्यटकांची मांदियाळी नजरेस पडल्याशिवाय राहणार नाही

पान १ वरुन

## वाढत्या घनकचरा समस्येवर आवश्यक कार्यवाही करा

सबब ग्रामपंचायतीमार्फत जमा होणाऱ्या कचऱ्याचे आदर्श व्यवस्थापन करण्याकरिता सिडकोमार्फत ग्रामपंचायतीसोबत उचित करार केल्यास तसेच येणारा प्रक्रिया खर्च माफ केल्यास ग्रामपंचायत हद्दीत घनकचरा व्यवस्थापन करणे शक्य होईल. म्हणून पनवेल ग्रामीण हद्दीतील सिडको नैना अधिसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या प्रस्तावांचा सकारात्मक विचार करून त्यांचे कचरा व्यवस्थापन सिडको यंत्रणेमार्फत करून देण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे.

## पनवेलच्या आकुर्लीत विकासकामांचा शुभारंभ


या कार्यक्रमास भाजप नेते संजय पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, अनुसूचित जाती सेलचे अध्यक्ष अमित जाधव, भाजप पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, तालुका चिटणीस यतीन पाटील, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, सरपंच सचिन पाटील, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. या विकासकामांमुळे आकुर्ली परिसरातील नागरिकांच्या सोयीसुविधांमध्ये वाढ होणार आहे.

# साजगावच्या २ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या यात्रेवर पावसाचे सावट

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापुरातील धाकटी पंढरी अशी ओळख असलेल्या विठ्ठल रखुमाई मंदिरातील यात्रेस कार्तिकी एकादशी म्हणजेच २ नोव्हेंबर २०२५पासून प्रारंभ होत असून १५ दिवस चालणाऱ्या या यात्रेवर परतीच्या पाऊस चांगलाच लांबला असल्याने पावसाचे सावट आहे. अंतर्गत मार्गावर चिखल साठल्याने माल वाहतूक करणे जिकिरीचे झाले आहे तर असाच पाऊस सुरू राहील्यास मालाचे नुकसान होऊन व्यापाऱ्यांना आर्थिक भुर्दंडाला सामोरं जावे लागणार आहे.

या यात्रेस रायगड , ठाणे, मुंबई, पुणे पश्चिम महाराष्ट्रातील लाखो भाविक दाखल होत असतात शेतीसाठी लागणारी अवजारे, सुकी मासळी घोंगडी बाजार कुस्तीचा फड व तमाशा मंडळ ही यात्रेची खास आकर्षण मानली जात असत मात्र मागील ९/१० वर्षात शेतीची जागा औद्योगिक कारखाने व नागरीकरणाने घेतली असल्याने साजगाव यात्रेत प्रसिद्ध असणारा बैलं



बाजार म्हैस खरेदी विक्री व घोंगडी बाजार डबघाईस आला असुन येत्या काही वर्षांत पूर्ण बंद होण्याच्या मार्गावर आहे. या यात्रेत बैल बाजार,कपडे, भांडी, घोंगडी, मिठाई, व सुक्या मासळीचा मोठा बाजार येथे भरतो. मौत-का-कुआ, उंच आकाश पाळणे यांच्या सह विविध मनोरंजनाचे अनेक प्रकार येथे पहायला मिळतात. खोपोली नगरपालिका यात्रेचे नियोजन करते.

एकादशीच्या आदल्या रात्री ताकई गावातून विठ्ठलाची पालखी निघुन प्रत्येक घरी नेली जाते. ताकई गावातील तीन घराण्यांना सालाबादप्रमाणे पालखीचा मान दिला जातो. यात्रा कालावधीत मंदिरात काकड आरती, भजन, कीर्तन, हरिपाठ, अशा धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. साजगांव यात्रेतील जिलेबीची चव घेण्यासाठी अनेक खवय्ये गर्दी करतात. स्वेटर, ब्लँकेट, घोंगड्या व चादरी यांचाही मोठा व्यापार या ठिकाणी होतो.

कोळी बांधव १५ दिवसात लाखो रुपयांची सुकी मासळी विक्री करतात. घाटमाथ्यासह विविध ठिकाणाहून खास सुकी मासळी खरेदीसाठी खवयांची तुंबडी उडते. यात्रेच्या काळात हा परिसर फुलून गेलेला असतो. मनोरंजनाचे अनेक कार्यक्रम व बच्चेकंपनीसाठी पाळणे, फिरते लाकडी घोडे, जादूचे खेळ, करमणुकीचे कार्यक्रम, लोप पावणारा तमाशा मंडळ व अन्य साधने यात्रेत असल्याने ही यात्रा परिसरातील नागरिकांसाठी वेगळी पर्वणीच असते.

यात्रेत खोपोली नगरपालिका कुस्त्यांचे आखाडे भरवत असल्याने या आखाड्यांत नामचीन कुस्ती पैलवान हजेरी लावतात. यात्रेत लहान मोठी विविध प्रकारची दुकाने थाटण्यात येतात, नगरपालिकेला पाच लाखांचा महसूल जमा होतो. पाणीपुरवठा, आरोग्य, विद्युत पुरवठा व स्वच्छता अश्या सोयी यात्रेकरूंना पुरवल्या जातात.वनखात्याच्या माळरानावर १५ दिवसांसाठी यात्रेसाठी राखीव असा कायमस्वरूपी शेरा मारण्यात आलाआहे विठ्ठल मंदिर देवस्थान ताकई यात्रा होण्यासाठी खोपोली १५ दिवसांसाठी पोलीस चौकी उभारून कायदा सुव्यवस्था सांभाळत असतात.

# पनवेल व खारघरमध्ये एकता दौड




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीचे औचित्य साधूनपनवेल शहर पोलीस ठाण्याच्यावतीने शुक्रवारी वडाळे तलाव परिसरात एकतादौड या रन फॉर युनिटी वॉकेथॉनचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

यावेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या संघटनकौशल्य आणि नेतृत्वामुळेच अखंड भारताची निर्मिती झाली, असे प्रतिपादन केले. देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जतन व मजबूत करण्यासाठी तसेचराष्टीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी देशभरात एकता दौडचे आयोजन केले जाते. स्वातंत्र्यानंतर विविध संस्थानांना एकत्र करून भारतात राजकीय एकात्मतानिर्माण करण्याच्या सरदार पटेल यांच्या अतुलनीय कार्याचा गौरव करण्यासाठीहा दिवस पाळला जातो.

वडाळे तलाव पोलीस चौकी येथून सुरू झालेल्या यादौडमध्ये भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, गणेश कडू, माजी नगरसेविका सुरेखा मोहकर,कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमितझुजाराव, शहर सरचिटणीस रुपेश नागवेकर, अमित ओझे, प्रशांत शेटे यांच्यासह सहायक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस नियिरक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक अभिजीत अभंग आणि१० सहायक पोलीस निरीक्षक, ६३ अंमलदासह सुमारे शेकडो नागरिकांनी या दौडमध्ये उत्साहाने भाग घेत सरदार वल्लभभाई पटेल यांना आदरांजली वाहिली.

वडाळा तलाव पोलीस चौकी येथून सुरू झालेली ही दौड व्ही. के. हायस्कूल,धूतपापेश्वर कॉर्नर, सावरकर चौक, नवीन कोर्ट, विरुपक्ष मंगल कार्यालय मार्गे पुन्हा वडाळा तलाव येथे संपन्न झाली. या मधुन महत्त्वाचा संदेश देण्यात आला.

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारताच्या लौहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्टीय एकता दिवस निमित्त खारघर पोलीस ठाण्याच्या वतीने एकता दौड तथा वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात भाजप खारघर मंडलातील कार्यकर्ते,पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग झाले होते.

देशातील एकता, अखंडता आणि बंधुतेचा संदेश जनमानसात पोहोचवण्यासाठी हा उपक्रमआयोजित करण्यात आला होता. एक भारत श्रेष्ठ भारत या घोषणेसोबत नागरिकांनीअभिमानाने पाऊल टाकत राष्टीय एकात्मतेचे महत्त्व अधोरेखित केले. सामाजिक

ऐक्य, राष्टनिष्ठा आणि जनजागृती यांचा संदेश देत एकतेचा जयघोष करण्यात आला.या वेळी खारघर भाजपचे शहर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटिल,जिल्हासचिव ब्रिजेश पटेल,माजी नगरसेवक नरेश ठाकूर, माजी नगरसेवकनिलेश बाविस्कर, किरण पाटिल, मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, महिलामोर्चा अध्यक्षा साधना पवार आदी मान्यवरांसह नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन खारघर पोलीस ठाण्याच्या पुढाकाराने करण्यात आले होते.यामध्ये सहभागी होत एकतेचा संदेश दिला.



# खारघरमध्ये दैनंदिन बाजार उभारण्याच्या प्रकल्पाला गती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका क्षेत्रातील खारघर परिसरातील नागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. खारघर सेक्टर १२ येथील भूखंड क्रमांक सी-४६ वर दैनंदिन बाजार उभारण्याच्या महत्त्वपूर्ण प्रकल्पाला गती मिळाली असून लवकरच या कामाचा शुभारंभ होणार आहे.

या माध्यमातून खारघर परिसरातील नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित आणि नियोजनबद्ध बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. खारघर प्रभाग क्रमांक ५ मध्ये एकूण १० मार्केट प्रकल्प उभारण्याच्यामहापालिकेच्या धोरणांतर्गत हा उपक्रम सुरू होत आहे. वाढती लोकसंख्या, व्यापारी वर्गाला जागेची अडचण आणि रस्त्यांवरील अस्वच्छ अनधिकृत बाजार यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाची दखल घेत हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

या दैनंदिन बाजारामुळे स्थानिक उद्योजक, महिलांच्या बचत गटांना, तसेच लघुउद्योगांना नवी संधी उपलब्ध होणार आहे. स्वच्छता, सुरक्षेसह आधुनिक सुविधांनी सुसज्ज हा बाजार उभारण्यात येणार असून नागरिकांना भाजीपाला, फळे, घरगुती साहित्य अशा आवश्यक वस्तू एकाच ठिकाणी मिळणार आहेत.

या प्रकल्पासाठी भाजपच्या माजी नगरसेविका हर्षदा अमर उपाध्याययांनी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच भाजपचे युवानेते अमर उपाध्याययांनीही प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून हा निर्णय मंजूर करूनघेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या प्रयत३ांना यश मिळाल्यानंतरनगरसेविका हर्षदा उपाध्याय यांनी आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर आणि पनवेल महानगरपालिका प्रशासनाचे आभार मानले आहेत. खारघरच्या नागरिकांना नियोजित बाजारपेठेची गरज होती.

## दुचाकीच्या अपघातात एकाचा मृत्यू, दुसरा जखमी

**पनवेल :** भरधाव वेगाने चालवीत असलेली मोटारसायकल स्लिप होऊन झालेल्या अपघातात मोटारसायकलस्वारांचा दुर्देवी मुत्यू झाला आहे . तर त्याचा सहकारी जखमी झाला असून हा अपघात पनवेल जवळील चिंचपाडा ब्रिज कडे जाणाऱ्या मार्गावर झाला आहे. मोटारसायकलस्वार सचिन पवार वय (२०) हा त्याचा मित्र विशाल जाधव वय (२१) याला घेऊन मोटारसायकलीवरून पनवेल जवळील चिंचपाडा ब्रिज कडे जाणाऱ्या मार्गावर जात असताना त्याची मोटारसायकल स्लिप होऊन झालेल्या अपघातात सचिन पवार याचा दुर्देवी मुत्यू झाला आहे, तर विशाल जाधव हा जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे

## घरकुल ते वास्तुविहार बस सुरू करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर १५ ते १८ परिसरातील नागरिकांना खारघर रेल्वे स्थानक गाठण्यासाठी बस क्रमांक ५३ व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची वाहतूक सुविधा नसल्यामुळे गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे खारघर



रेल्वे स्थानक ते वस्तूविहार या मार्गावर नवीन बस सुरू करण्यात यावी, अशा मागणीनी सर्व स्तरातून होत आहे .

खारघर सेक्टर १५ ते १७मध्ये जवळपास चार हजार नागरिक वास्तव्य करीत आहे. शिवाय या परिसरात चार शाळा आहेत. या भागात नवी मुंबई परिवहन विभागाकडून एनएमएमटीची ५३ क्रमांकाची एकमेव बस सेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे इतर कोणताही पर्याय नसल्याने नागरिकांना पायी जावे लागते. तर खारघर टोल नाका येथील बस थांबा गाठावे लागते. तसेच ५० ते ६० रुपये भाडे देऊन खारघर रेल्वे स्थानक गाठावे लागत असल्यामुळे येथील रहिवाश्यांनी तुर्भे आगारचे व्यवस्थापक सुनील जगताप यांची भेट घेऊन येथील मार्गावर नवीन बस सुरू करण्याची मागणी केली आहे.

## तळोजात महिला आत्महत्येच्या दोन घटना

**पनवेल :** जवळील तळोजा परिसरात सलग दोन महिलांच्या आत्महत्येच्या घटना



घडल्या आहेत. पहिल्या घटनेत हॉटेल मॅनेजमेंट शिकणाऱ्या १९ वर्षीय तरुणीने इमारतीच्या दहाव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. तर दुसऱ्या घटनेत नावडे गावात हुंडाबळीमुळे एका विवाहितेने गळफास घेऊन जीवन संपवले. या दोन्ही घटनांमुळे तळोजा व नावडे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.तळोजा उपनगरातील एका उंच इमारतीत घडली. तरुणीने इमारतीच्या आपत्तीवेळेसाठी राखीव असलेल्या दहाव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. दुसरी घटना तळोजातील नावडे गावात घडली. एका विवाहितेने सासरच्या शारीरिक आणि मानसिक छळाला कंटाळून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी सहा जणांवर हुंडाबळीचा गुन्हा दाखल केला असून पती, सासू-सासरे यांना अटक केली आहे.

## नवीन पनवेलमधील जुन्या रस्त्यांची रुंदी वाढवूनच इमारत पुनर्बांधणी परवानगी द्यावी -ॲड. मनोज भुजबळ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नविन पनवेल रेल्वे स्टेशनला लागूनच वसलेले असल्याने आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागात नव्याने मोठ मोठे गृहसंकुल उभे राहिल्याने व भविष्यात नैना अंतर्गत सुध्दा प्रचंड मोठ्या प्रमाणावर गृहसंकुल व व्यापारी संकुल, शाळा, कॉलेज, त्याचप्रमाणे वेगवेगळी सरकारी कार्यालय उभी राहणार आहेत. त्यामुळे नविन पनवेल मध्ये नव्याने पुर्नबांधणी होत असलेल्या इमारतींमध्ये पुरेशी पार्किंग ठेवणे, जुन्या रस्त्यांची रुंदी वाढवूनच इमारत आराखडयास पुर्नबांधणी परवानगी देण्याची मागणी माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनाही निवेदनाची प्रत देण्यात आली आहे.

या निवेदनात त्यांनी म्हंटले आहे की, नविन पनवेल मधील सीकेटी शाळेसमोरील रस्त्यामधील



गटार / फूटपाथ याची रुंदी कमी करुन रस्त्याची रुंदी वाढविणे, सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूने पार्किंग कमीत कमी २-२ मीटर रस्त्यांची रुंदी दोन्ही बाजूने वाढवून त्याचा वाढीव एफ.एस.आय. सदर विकसित होणाऱ्या बिल्डींग / सोसायट्यां द्यावा व रस्ता रुंद करावा, तसेच नविन पनवेल मधील सर्व अंतर्गत छोटया रस्त्यांची रुंदी रस्त्यांच्या दोन्ही बाजूने १-१ मीटर रस्त्यांची रुंदी वाढवून त्याचा वाढीव एफ.एस.आय. त्या बांधील इमारतींना दयावा. जेणेकरुन रहिवासीयांचे नुकसान होणार नाही, ह्या पुनर्विकसित होणाऱ्या इमारतीमध्ये दुपटीने रहिवासी / वाणिज्य गाळेधारक रहावयास अथवा / व्यापारी म्हणून येणार आहेत. प्रत्येक इमारतीला स्वतःची पुर्ण वाणिज्य व सदनिका यांना पार्किंगची सोय झालीच पाहिजे अन्यथा पुन्हा पार्किंगचा प्रश्न ऐरणीवर येवून स्टेशन रोड अथवा आजूबाजूच्या रहिवासियांना राहणे / जगणे मुश्किल होईल,

अनेक बिल्डर हे ओ.सी. मिळविण्यासाठी २ ते ३ महिन्यासाठी भाडयाने पार्किंगची (मेकॅनिकल पार्किंग) सोय करुन नंतर ओ. सी. मिळाल्यावर ती पार्किंग काढून टाकतात व पनवेल महानगरपालिका किंवा सिडको यांची फसवणूक करतात. याबाबत पनवेल महानगरपालिकेने दक्ष रहावे असे अधोरेखित केले आहे. तसेच या विषयाबाबत त्वरित कार्यवाही करुन नविन पनवेल पूर्व व पश्चिम येथील रहिवासियांना न्याय द्यावा अन्यथा आम्हाला आंदोलन छेडावे लागेल असा इशारा दिला आहे.

## नेरे ग्रामपंचायत देणार अंत्यसंस्काराला मोफत लाकडे

**नवीन पनवेल :** नेरे ग्रामपंचायत हद्दीतील मृत पावलेल्या व्यक्तीच्या अंत्यसंस्काराला मोफत लाकडे देण्याचा निर्णय ग्रामपंचायतीने घेतला आहे. नेरे ग्रामपंचायतच्या या उपक्रमाचे विविध स्तरातून कौतुक केले जात आहे. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यानंतर संपूर्ण कुटुंब दुःखात असते. यावेळी गावातील एखाद्या व्यक्तीला लाकडे आणि अन्य सामान आणण्याची जबाबदारी दिली जाते. अंत्यसंस्कारासाठी लाकडे विकत टेम्पोमधून आणावी लागतात. याबाबत नेरे ग्रामपंचायतने एक पाऊल पुढे टाकत दीड वर्षांपूर्वी अंत्यविधी करण्यासाठी लागणारे सामान मोफत देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर २९ ऑक्टोबर रोजी अंत्यसंस्कारासाठी लागणारी लाकडेदेखील मोफत देण्याचा निर्णय सरपंच प्रकाश घाडगे, उपसरपंच राम पाटील, ग्रामसेविका राजश्री पाटील यांनी घेतला आहे. नेरे ग्रामपंचायत सदस्य शैलेश जाधव, तन्वी ठाकूर, सविता चोरघे, दिनेश मानकामे, कल्पना वाघे, नीलिमा पाटील, शैलेश पाटील, मनीषा गायकर, प्रगती फडके, वंदना रोडपालकर यांनी या उपक्रमाला पाठिंबा दिला आहे.

## माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्ताने अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली. यावेळी अतिरीक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक् कैलास गावडे, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त अभिषेक पराडकर, उपायुक्त नानासाहेब कामठे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, मुख्य



लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, उपलेखापाल संदिप खुरपे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी नितीन साके तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पुष्पक नगर परिसरातून लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल** : येथील नव्याने उभारण्यात आलेल्या पुष्पक नगर परिसरात झालेल्या दोन चोऱ्यांमध्ये लाखोंचा ऐवज लंपास




अज्ञात चोरट्याने केल्याची घटना घडली आहे.

यामध्ये अंबादास उंबरे हे त्यांच्या राहत्या घरात झोपले असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या राहत्या घराच्या हॉलमधील खिडकीची काच सरकावून त्या वाटे घरात प्रवेश करून त्यांच्या घरातील लोखंडी कोठीमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल फोन तसेच त्यांच्या घरा शेजारी राहणारे संजय झुगे यांच्या घरातील मोबाईल फोन व रोख रक्कम असा ऐवज चोरून नेल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पनवेल महापालिकेतर्फे दक्षता जनजागृती सप्ताह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय दक्षता आयोग, तसेच राज्य शासनाच्या सूचनेनुसार दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जात आहे. या अंतर्गत आज दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्राचे पोलिस अधिक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलिस अधिक्षक शिवराज पाटील म्हणाले, कोणत्याही प्रलोभनांना न भुलून जाता शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समाधानाने, प्रामाणिकपणे व सचोटीने काम करावे. तसेच अधिकारी, कर्मचारी व नागरिकांमध्ये भ्रष्टाचाराबाबत जनजागृतीची आवश्यकता स्पष्ट करताना त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याची माहिती सांगितली. यावेळी आपल्या प्रास्ताविकामध्ये आयुक्त मंगेश चितळे यांनी शासकीय सेवेत काम करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्व नियमाचे पालन करत काम सचोटीने,निस्पृह काम करायला हवे असे प्रतिपादन केले. यावेळी मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते उपायुक्त रविकिरण घोडके, नानासाहेब कामठे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे तसेच लाचलुचपत विभागाचेअप्पर पोलिस निरीक्षक भागवत सोनावणे, पोलिस उप अधिक्षक धर्मा सोनके उपस्थित होते.

## महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना ई-ऑफिस प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी लोकसेवा हक्क अधिनियमाचे प्रशिक्षण आज दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी आद्य वासुदेव बळवंत फडके नाटचगृहात आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

यावेळी उपायुक्त स्वरूप खारगे यांनी महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम २०१४ अंतर्गत नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध सेवा व सुविधा याबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांना



माहिती दिली.

तसेच नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांबाबत दक्ष व तत्पर रहावे अशा सूचना दिल्या. नागरिकांच्या समस्या व तक्रारीबाबत महापालिकेने सुरू केलेल्या तक्रार निवारण प्रणाली (ग्रीव्हीअन्स पोर्टल) वरती तसेच महापालिकेच्या कॉल सेंटरवतरी येणाऱ्या तक्रारींचा तात्काळ निपटारा करण्याबाबत उपायुक्तांनी मार्गदर्शन केले. राज्य शासनाच्या विविध धोरणांची परिणामकारक अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी अद्ययावत ठेवण्यासाठी १५० दिवसांचा कार्यक्रम शासनामार्फत राबविण्यात येत आहेत. यासाठी हे प्रशिक्षण महत्वपूर्ण होते.

### काय आहे प्रणाली?

कार्यालयीन कामकाज वेगवान व्हावे, कामात पारदर्शकता यासाठी महापालिकेने ई ऑफीस प्रणालीचा प्रभावी वापर महापालिकेमध्ये केला जात आहे. यामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. याचबरोबर कर्मचाऱ्यांच्या एचआरएमएस डॅशबोर्ड, हजेरी डॅशबोर्ड याविषयीची ही माहिती दिली.



**पनवेल : भारताचे पहिले उपपंतप्रधान, लोहपुरुष आणि एकतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यानी अभिवादन केले.**


## संपादकीय

# मुलांच्या सुटकेचे समाधान

लघुपटाच्या ऑडिशनसाठी बोलावून १७ अल्पवयीन मुलांना रोहित आर्या नावाच्या एका इसमाने गुरुवारी पवईतील स्टुडिओमध्ये ओलिस ठेवले. मुलांची सुटका करताना पोलिसांनी केलेल्या कारवाईत अपहरणकर्त्या आर्याचा मृत्यू झाला. उलटसुलट दाव्यांमुळे काही प्रश्न उपस्थित करणाऱ्या या घटनेत मुलांची सुरक्षितताच प्राधान्याची होती एवढेच आता निश्चितपणे म्हणता येईल. अन्य बाबी अधिक चौकशीअंतीच स्पष्ट होतील.

**रोहित आर्या नामक कथित चित्रपटनिर्मात्याने ऑडिशनच्या म्हणजेच निवडचाचणीच्या नावाखाली बोलावून १७ मुलांना पवई येथील आरए स्टुडिओमध्ये गुरुवारी ओलिस ठेवले. आर्याने दिलेल्या जाहिरातीमुळे राज्यातील निरनिराळ्या शहरांतून तीन दिवसांपासून तेथे १५ वर्षे वयोगटातील अनेक मुले चाचणीसाठी येत होती. गुरुवारी सकाळी १७ मुले तेथे आली. दुपारनंतर आर्याने काही पालकांना पाठवलेल्या व्हिडिओमुळे मुलांना ओलिस ठेवल्याचे स्पष्ट झाले. अपहरणकर्त्याशी बोलून मुलांची सुखरूप सुटका करण्याचे आव्हान पोलिसांपुढे होते. त्याच्याकडे ज्वलनशील पदार्थ होते असेही समजते. धोका न पत्करता पोलिसांनी स्वच्छतागृहाच्या खिडकीतून स्टुडिओमध्ये प्रवेश केला व मुलांची सुटका करण्याच्या प्रयत्नात पोलिसांनी आर्याच्या दिशेने एक गोळी झाडली व ती लागून तो गंभीर जखमी झाला. नंतर रुग्णालयात त्याचा मृत्यू झाला असे समजते. हा रोहित आर्या नावाचा इसम चित्रपटनिर्माता होता, तो समाजसेवा देखील करीत असे आणि तो मनोरुग्ण देखील होता अशा उलटसुलट बातम्या माध्यमांमध्ये दिसतात. यातले खरे काय नि खोटे काय हे तपासाअंतीच स्पष्ट होईल. शाळकरी मुलांना बंदुकीच्या धाकावर ओलिस ठेवणाऱ्या इसमाला दया दाखवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आर्याकडे एक एअरगन आणि काही रसायने होती असे सांगितले जाते. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला नसता तर केवढी मोठी दुर्घटना घडली असती याची कल्पना देखील न केलेली बरी. मुलांना बंदुकीच्या धाकावर आपल्या स्टुडिओत ओलिस ठेवण्याचा गुन्हा आर्याने केला. सरकारी व्यवस्थेशी वाटाघाटी करण्यासाठी मुलांना ओलिस ठेवणे हे नक्कीच धिक्काराई कृत्य आहे. मुलांचा जीव धोक्यात घालणे पोलिसांना शक्यच नव्हते. तिथली परिस्थिती पाहून कारवाईबद्दलचा निर्णय पोलिसांना काही सेकंदात घ्यावा लागला असावा. तरीही आर्याच्या एन्काऊंटरनंतर उलटसुलट प्रतिक्रियाही येत आहेत. गुन्हेगार आर्याच्या पायावर गोळ्या झाडायला हव्या होत्या असे तारे एका वकिलाने तोडले आहेत. काही सेकंदांत निर्णय घेण्याची वेळ येते तेव्हा डाव्या पायावर गोळी मारावी की उजव्या असला भपंक काथ्याकूट करायचा नसतो हे साधे भानही या टीकाकारांना नाही. मुलांची सुखरूप सुटका करण्याचे काम पोलिसांनी चोख बजावले आहे असेच म्हणावे लागेल. लहान मुलांच्या सुरक्षिततेबद्दल प्रगत देशांमध्ये अतिशय काळजी घेतली जाते. प्रसंगी पालकांना देखील तिथे धारेवर धरले जाते. दुर्दैवाने अशा प्रकारची संवेदनशीलता भारतात फार उशीराने आली आहे. लहान मुलांच्या सुरक्षिततेबद्दल झिरो टॉलरन्सचे धोरणच अपेक्षित असते. पवईतील घटनेनंतर ज्या काही अन्य बातम्या बाहेर येत आहेत, त्या गंभीर स्वरुपाच्या आहेत. त्यात थोडे जरी तथ्य असेल तर व्यवस्थेच्या सुधारणेसाठी पावले उचलण्याची गरज आहे. गुन्हेगार रोहित आर्या याने कसले तरी रसायन आणून ठेवले होते. ते ज्वालाग्राही आहे किंवा नाही याची शहानिशा करण्यात येत आहे, परंतु मुलांच्या जिवाशी खेळ करणाऱ्या आर्यासारख्या इसमाविरोधात पोलिसांनी कठोर कारवाई करणेच आवश्यक होते इतकेच आता म्हणता येईल.**

# अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक नरेंद्र दाभोलकर



साधनेचे साधक, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक, समाजसेवक, लेखक, विचारवंत, कबड्डीपटू, पद्मश्री डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म अच्युत आणि ताराबाई या दाम्पत्याच्या पोटी साताऱ्याजवळील माहुली या गावी १ नोव्हेंबर १९४५ रोजी झाला. ते कुटुंबातील दहा मुलांपैकी सर्वात लहान होते. शिक्षणतज्ज्ञ आणि विचारवंत देवदत्त आणि श्रीपाद हे त्यांचे वडीलबंधू. नरेंद्र यांचे शालेय शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल सातारा आणि विलिंग्डन कॉलेज, सांगली येथे झाले. त्यांनी मिरज येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस पदवी प्राप्त केली होती.

डॉ. दाभोलकर यांचा विवाह डॉ. शैला यांच्याशी झाला. एक तप वैद्यकीय सेवा केल्यावर ते वर्ष १९८०मध्ये पूर्णवेळ समाजसेवक बनले. बाबा आढाव यांच्या 'एक गाव एक पाणवठा' या सामाजिक न्यायाच्या चळवळींमध्ये ते सहभागी झाले. त्यांनी व त्यांच्या पत्नी डॉ. शैला यांनी वर्ष १९९१मध्ये समाजातील उपेक्षितांसाठी परिवर्तन संस्थेची स्थापना केली. १५ ऑगस्ट १९४८ रोजी साने गुरुजींनी स्थापन केलेल्या 'साधना' या साप्ताहिकाचे २५ ऑक्टोबर १९९८ ते २० ऑगस्ट २०१३ या कालावधीत आयुष्याच्या अखेरपर्यंत ते संपादक होते.

दाभोलकर कबड्डीपटू म्हणून क्रीडाक्षेत्रात प्रसिद्ध होते. ते शिवाजी विद्यापीठ कबड्डी संघाचे कर्णधार होते. त्यांनी बांगलादेशविरुद्ध कबड्डी स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले होते. कबड्डीवरचं मराठीतलं पहिलं पुस्तक डॉ. दाभोलकरांनीच लिहिले आहे. कबड्डीसाठी त्यांना महाराष्ट्र सरकारचा शिवछत्रपती युवा पुरस्कार मिळाला होता. त्यांनी क्रीडा संघटक, क्रीडा स्तंभलेखक, सामन्याचे धावते निवेदक अशा जबाबदाऱ्याही पार पाडल्या.

गणपती विसर्जनाने नदीचे पात्र खराब होते म्हणून कृत्रिम तलाव, टाकी यामध्ये विसर्जनाची पद्धत त्यांनीच सुरू केली तसेच 'एक गाव एक गणपती' ही संकल्पनाही मांडली. त्यांनी सामजिक प्रबोधनात्मक सुमारे १५ पुस्तके लिहिली. अंधश्रद्धेमुळे समाजाचे होणारे आर्थिक शोषण थांबविणे या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी अंधश्रद्धेविरुद्ध एल्गार पुकारला.

कपोलकल्पित चेटुकविद्येची तसेच दैवी कोप याची भीती दाखवून बुवाबाजीने लोकांच्या अंधश्रद्धेचा गैरफायदा घेऊन लुबाडणाऱ्या भोंदू भविष्यकार यांचे खरे रूप समान्य माणसापुढे आणणे हाच त्यांचा मूळ उद्देश होता. त्यांनी फेडरेशन ऑफ इंडियन रॅशनलिस्ट असोसिएशनचे उपाध्यक्ष म्हणूनही काम केले. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदा अमलात यावा यासाठी कायदा केला जावा म्हणून वर्ष २००३पासून सुमारे १६ वर्षे संघर्षमय पाठपुरावा केला.

टीकाकारांनी त्यांच्यावर धर्मविरोधी असल्याचा आरोप केला, परंतु एजन्सी फ्रान्स-प्रेस या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले, संपूर्ण विधेयकात देव किंवा धर्माबद्दल एकही शब्द नाही. भारतीय संविधानाने उपासनेचे स्वातंत्र्य दिले आहे आणि ते कोणीही हिरावून घेऊ शकत नाही, हा कायदा शोषण करणाऱ्या पद्धती विरोधात आहे.

जगाच्या इतिहासात सर्वच समाजप्रबोधकांना धर्मांध लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. त्याला दाभोलकर अपवाद नव्हते. त्यातूनच २० ऑगस्ट २०१३ रोजी यांची हत्या झाली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी घाईघाईने सरकारने अंधश्रद्धा निर्मूलनासाठी वटहुकूम काढून तो कायदा अमलात आणला. मूळ विधेयकाचे नामकरण अंधश्रद्धाऐवजी 'जादूटोणा विरोधी' असे करण्यात आले आणि कायदा अमलात आला. अमेरिकेतील महाराष्ट्र फाउंडेशनने पहिला समाजगौरव पुरस्कार अंधश्रद्धा निर्मूलन समितीला दिला. भारत सरकारने दाभोलकरांना मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार दिला. (साभार : प्रभात)

# संगीत दिग्दर्शक, कवी, लेखक यशवंत देव



यशवंत त्र्यंबक देव यांचा जन्म १ नोव्हेंबर १९२६ रोजी पूर्वीच्या कुलाबा जिल्ह्यातील पेण येथे झाला. त्यांचे वडील त्र्यंबक गोविंद देव हे संगीतप्रेमी होते. ते स्वतः अनेक वाद्ये उत्तमरीत्या वाजवत.

यशवंत देव यांचे शालेय शिक्षण प्रथम पेण खासगी विद्यालय येथे व त्यानंतर नवीन समर्थ विद्यालय, तळेगाव, नूतन मराठी विद्यालय, पुणे आणि चिकित्सक समूह विद्यालय, गिरगाव, मुंबई अशा विविध शिक्षण संस्थांमध्ये झाले. ते १९४४मध्ये चिकित्सक समूह विद्यालयातून मॅट्रिकची परीक्षा सर्व विषयांत प्रावीण्य मिळवून उत्तीर्ण झाले. नंतर सेंट झेवियर्स महाविद्यालय, मुंबई आणि राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर येथून १९४८मध्ये पदार्थविज्ञान आणि गणित हे विषय घेऊन त्यांनी बीएस्सीची पदवी मिळवली.

शास्त्रशाखेचे विद्यार्थी असलेल्या यशवंत देव यांनी आपली कारकीर्द विशेषत: सुगम संगीतामध्ये घडवली. त्यांच्यावर संगीताचे प्राथमिक संस्कार त्यांच्या वडिलांनी केले. त्यांच्या घरी नेहमी संगीत क्षेत्रातील दिग्गज कलाकार येत असत. त्यांचे गाणे सतत कानांवर पडत असे. नकळत घडलेल्या या संस्कारांचा त्यांच्या संगीत कारकिर्दीवर प्रभाव पडला.

देव यांनी निदान सुरुवातीच्या काळात तरी पूर्णपणे संगीताला वाहून घ्यायचे असे ठरवले नव्हते, ते आपोआप घडत गेले. पुण्याला शाळेत असताना त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला होता, पण लवकरच हे शिक्षण थांबले. स्वयं-अध्ययन करून त्यांनी शास्त्रीय संगीत आत्मसात केले आणि १९६८ साली शास्त्रीय संगीताची पदवी मिळवली. नागपूर आकाशवाणीवर काम करताना त्यांनी सतारवादनामध्ये संगीत विशारद ही पदवी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण होऊन मिळवली.

दीर्घकाळ आकाशवाणीवरची नोकरी देव यांच्या दृष्टीने एक प्रयोगशाळाच ठरली. काही काळ त्यांनी शिधावाटप कार्यालयात काम केले. नंतर एचएमव्ही आणि शेवटी धारवाड, मुंबई, नागपूर या आकाशवाणी केंद्रांवर तसेच 'विविध भारती'च्या हिंदी विभागात त्यांनी कार्यक्रम निर्माता म्हणून काम केले.

आकाशवाणीवर काम करताना त्यांनी अनेक संगीतिका, नाटकांचे पार्श्वसंगीत, संगीत आणि स्वतंत्रपणे अनेक गीतांचे संगीत दिग्दर्शन केले. त्यांनी १९६१-६२मध्ये सुगम संगीताचा विशेष कार्यक्रम 'भावसरगम' याची निर्मिती करून मराठीतल्या अनेक कवींच्या रचना रसिकांपर्यंत पोहचवल्या. देव यांनी अनिल विश्वास यांना आपले गुरू मानले आणि त्यांच्या संगीत नियोजनातून प्रेरणा घेतली.

देव यांनी १९५७मध्ये 'झालं गेलं विसरून जा' या चित्रपटासाठी गीतकार-संगीतकार म्हणून प्रथम काम केले. चित्रपटांप्रमाणेच नाट्यक्षेत्रातील त्यांचे योगदान लक्षणीय आहे. सहा दशकांहून अधिक काळ यशस्वीपणे चाललेल्या त्यांच्या या संगीत प्रवासात त्यांना अनेक पुरस्कार, सन्मान मिळाले.

**-संगीता बापट, आर्या जोशी**





# युट्यूब शॉर्ट्सचे नवीन फीचर! आता 'वॉच टाइम लिमिट'

जर तुम्ही अशा लोकांमध्ये सामील असाल, जे एकदा YouTube Shorts पाहणे सुरू करतात आणि तास न् तास फोनवरून नजर हटवू शकत नाहीत, तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. Google च्या मालकीच्या YouTube कंपनीने शॉर्ट्ससाठी (Shorts) Instagramसारखे एक नवीन फीचर लाँच केले आहे. या फीचरमुळे वापरकर्त्यांना त्यांच्या वॉच टाइमवर (पाहण्याच्या वेळेवर) स्वतः नियंत्रण ठेवण्याची संधी मिळणार आहे. या फीचरच्या मदतीने वापरकर्ते ठरवू शकतील की, त्यांना दररोज किती वेळ शॉर्ट्स पाहायचे आहेत आणि ती निश्चित केलेली वेळ पूर्ण होताच, त्यांना एक नोटिफिकेशन अलर्ट मिळेल.





या फीचरची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, वापरकर्ते स्वतःची टाइम लिमिट कस्टमाइज करू शकतात. कंपनीकडून कोणतीही निश्चित मर्यादा दिलेली नाही.

वेळ मर्यादा : वापरकर्ते त्यांच्या सोयीनुसार ३० मिनिटे, एक तास किंवा दोन तास अशी मर्यादा सेट करू शकतात. अलर्ट: ही निश्चित वेळ पूर्ण होताच, स्क्रीनवर एक नोटिफिकेशन दिसेल, जे वापरकर्त्याला आठवण करून देईल की त्यांचे शॉर्ट्स पाहण्याचे वेळ संपली आहे.

YouTubeने माहिती दिली आहे की, वापरकर्ते त्यांच्या अकाउंटच्या सेटिंग्समध्ये जाऊन हे फीचर क्टिव्हेट करू शकतात. सेटिंग्जमध्ये Shorts Watch Limit नावाचा एक नवीन पर्याय जोडण्यात आला आहे, ज्या अंतर्गत ते त्यांच्या आवडीनुसार वेळ सेट करू शकतील. कंपनीने हे फीचर हळूहळू सर्व वापरकर्त्यांसाठी रोलआउट (Rollout) करण्यास सुरुवात केली आहे.


### Parental Control

भविष्यात हे फीचर पॅरेंटल कंट्रोल (Parental Control - पालक नियंत्रण) फीचरशीदेखील जोडले जाईल. एकदा मर्यादा सेट केल्यावर मुलांना ते डिसमिस करता येणार नाही, ज्यामुळे हे फीचर कुटुंबांसाठी खूप उपयुक्त ठरेल. टेक तज्ज्ञांच्या मते, YouTubeचे हे पाऊल डिजिटल हेल्थ आणि वापरकर्त्यांच्या कल्याण (User Well-Being)च्या दिशेने एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. यामुळे लोकांना त्यांच्या ऑनलाईन सवयींवर नियंत्रण ठेवण्यास आणि डिजिटल संतुलन राखण्यास मदत मिळेल.

# विनोदी अभिनेते शरद तळवळकर

साधे-सरळ, सुशील आणि एकमार्गी असणारे, मराठी चित्रपटसृष्टीवर हास्याची लकेर उमटविणारे तसेच आपल्या कामाशी एकनिष्ठ राहिलेले दिग्गज अभिनेते म्हणजेच शरद गणेश तळवलकर. त्यांचा जन्म १ नोव्हेंबर, १९१९ रोजी झाला. शालेय जीवनात म्हणजे पुण्याच्या भावे स्कूलमध्ये ऐनवेळेस 'शिशुपाल' आणि 'साष्टांग नमस्कार' या नाटकातील 'भद्रायू भाटकर' ही पात्रं त्यांनी अतिशय सुंदर रीतीने रंगविली होती. विशेष म्हणजे शाळेत असताना ते शिक्षकांच्या नकला हुबेहूब करायचे.

प्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे यांनी एका अभिनेत्याच्या अभिनयाचे मार्मिक वर्णन करून ठेवले आहे. ते म्हणतात, हा माणूस इतका साधा आहे की, यांच्या नावात काना, वेलांटी, उकार काहीच नाही हो. अभिनयातील सहजता हा दुर्मिळ गुण या कलाकारामध्ये आहे. आपलं बोलणं विनोदी करायला त्याला कसलीही युक्ती वापरावी लागत नाही. नाटककाराने लिहिलेला संवाद पुरेसा हशा पिकविणारा नाही, या समजुतीने काही विनोदी नट आपली विनोदबुद्धी वापरतात, नको त्या ठिकाणी नको इतके अंगविक्षेप करतात. हशा पिकविण्यासाठी या कलाकाराला यापैकी कशाचीच गरज भासली नाही.




## निमित्त

१९३५ साली 'रणदुंदुभी' नाटकात शिशुपालाची भूमिका करणारा कलाकार ऐन वेळी अडला आणि शरद तळवलकरांनी आपल्या अभिजात कलागुणांनी त्या भूमिकेत कमालीचा रंग भरला. तेव्हापासून दरवर्षी स्नेहसंमेलनाच्या नाटकात त्यांच्यासाठी आग्रह धरला जाऊ लागला. इथूनच त्यांच्या रंगभूमीच्या प्रवासाला सुरुवात झाली. नटश्रेष्ठ केशवराव दाते यांच्या पाहण्यात त्यातील एक भूमिका आली आणि त्यांच्या नाट्य विकास संस्थेत त्यांनी तळवलकरांना निमंत्रण दिले. नाटकात कामे करणे ही त्या काळात फारशी समाजमान्य गोष्ट नव्हती. वडिलांनी नाटक कंपनीत जाण्यास विरोध केल्यानंतर नाटकाच्या वेडापायी शरद तळवलकरांनी घर सोडले. अभिनयाबाबत मार्गदर्शन घेण्यासाठी ते कोल्हापूरला मास्टर विनायक यांच्या 'हंस पिक्चर्स'मध्ये बाबूराव पेंढारकरांना भेटले. त्यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी आधी शिक्षण पूर्ण करायचे ठरवून जोडीला अकाउंटंटची नोकरी पत्करली. महाविद्यालयाच्या नाटकांतूनही त्यांच्या भूमिका प्रेक्षकप्रिय झाल्या. व्यावसायिक नाटकांतून भादव्या, फाल्गुनराव, कामण्णा, तळीराम, धैर्यधर अशा भूमिका शरद तळवलकर करू लागले. १९५२ साली गाजलेल्या 'पेडगावचे शहाणे' आणि 'लाखाची गोष्ट' या राजा परांजपे दिग्दर्शित चित्रपटांत त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. तसेच दत्ता धर्माधिकारी यांच्या 'अखेर जमलं' या चित्रपटात लक्षात राहण्याजोगी भूमिका मिळाली.

'छापील संसार' नावाच्या पहिल्या व्यावसायिक नाटकात त्यांनी काम केले. हा अभिनयाचा छंद जोपासत असताना त्यांनी मिलिटरी अकाऊंट्समध्ये नोकरी केली. त्यावेळेस त्यांचे शिक्षणही सुरू होते. विनोदी अभिनेता म्हणून त्यांनी केलेला पहिला चित्रपट होता 'माझा मुलगा.' तिथून सुरू झालेला विनोदी अभिनेत्याचा प्रवास शेवटपर्यंत सुरूच होता. नाट्य आणि चित्रपट दोन्ही क्षेत्रात त्यांनी आपल्या अभिनयाचा प्रभाव पाडला. अशा या चतुरस्र अभिनेत्याचे २२ ऑगस्ट २००१ रोजी निधन झाले. (सभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# केवळ एक ग्लास दारू पिऊनही वाढतो आजार

दारू ही शरीरासाठी नुकसानकारक असते, पण तरीही काही लोक रोज दारू पितात. तर काही लोक कधी कधी पितात. नुकत्याच करण्यात आलेल्या एका स्टडीमध्ये खुलासा झाला की, जे लोक रोज कमीत कमी एक ड्रिंकही घेत असतील तरी त्यांचं ब्लड प्रेशर वेगाने वाढतं. उछ्छ च्या रिपोर्टनुसार, हाय ब्लड प्रेशरच्या समस्येचा सामना त्या तरूणांनाही करावा लागतो ज्यांना आधी हाय ब्लड प्रेशरची समस्या नाही.



हा रिसर्च अमेरिकन असोसिएशन जर्नल हायपरटॅशनमध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. १९९७ ते २०२१ पर्यंत ७ इंटरनॅशनल स्टडीजच्या डेटामध्ये आढळून आलं की, जे लोक रोज एक ग्लास दारूचंही सेवन करतात त्यांच्यात कधी कधी दारूचं सेवन करणाऱ्या लोकांच्या तुलनेत ब्लड प्रेशर वाढण्याचा धोका जास्त असतो.

मायो क्लीनिकनुसार, हाय ब्लड प्रेशरची लक्षण समोर येईपर्यंत ही समस्या शरीराचं आतून बरंच नुकसान करते. जर बीपी कंट्रोलमध्ये नसेल तर अपंगत्व, खराब लाइफ क्वालिटी आणि इतकंच काय तर हार्ट अटॅक किंवा स्ट्रोकचीही समस्या होऊ शकते.

रिसर्चचे मुख्य लेखक डॉ. मारको विसिटी म्हणाले की, हे जाणून घेतल्यावर हैराण झालो की, फार कमी दारूचं सेवन करणाऱ्या तरूणांमध्ये ब्लड प्रेशरची लेव्हल जास्त होती. पण या लोकांचं ब्लड प्रेशर फार जास्त दारू पिणाऱ्या लोकांच्या तुलनेत बरंच कमी होतं.

ब्लड प्रेशर मरकरीच्या मिलीमीटरच्या दोन संख्यांमध्ये मोजलं जातं. वरच्या नंबरला सिस्टोलिक म्हटलं जातं, जे हृदयाच्या मांसपेशींचं आकुंचन आणि ब्लड पंप मोजतं. तेच खालच्या नंबरला डायस्टोलिक म्हटलं जातं. जे हार्ट बीटच्या मधला दबाव मोजतं.

स्टडीमध्ये आढळून आलं की, सिस्टोलिक ब्लड प्रेशरवर दारूचा नकारात्मक प्रभाव अशा पुरूष आणि महिलांवरही पडत आहे जे दररोज फार कमी प्रमाणातही दारूचं सेवन करतात. स्टडीचे सह-लेखक डॉ. पॉल व्हेल्टन म्हणाले की, 'सिस्टोलिक आणि डायस्टोलिक दोन्ही रीडिंग कार्डियोवस्कुलर आजारांचा धोका वाढवतात. पण दोन्हीपैकी तरूणांमध्ये सिस्टोलिक ब्लड प्रेशरचा धोका सगळ्यात जास्त असतो.

# माथेरानमध्ये झेंडा फडकवण्याचा भाजपचा संकल्प

**नेरळ : प्रतिनिधी**

आगामी माथेरान नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने नगराध्यक्ष पदावर दावा ठोकला आहे. माथेरान नगर परिषदेवर कमळ फुलवण्यासाठी भाजप आता स्वबळावर निवडणुकीत उतरणार असल्याचे संकेत मिळत आहेत.



भाजपच्या वतीने माथेरान येथील रंगोली हॉटेल येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीसाठी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस प्रकाश बिनेदार, नितीन पाटील, दीपक बेहेरे, चिटणीस नितीन कांदळगावकर, तसेच ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश भगत आदी प्रमुख उपस्थित होते.

यावेळी माथेरानचे माजी नगराध्यक्ष तथा भाजप नेते आकाश चौधरी, शहराध्यक्ष प्रवीण सपकाळ, सरचिटणीस राजेश चौधरी, माजी नगरसेवक प्रदीप घावरे, अरविंद शेलार, संदीप कदम, राकेश चौधरी आदींसह मोठ्या संख्येने पक्ष कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान कार्यकर्त्यांनी भाजपने माथेरान नगरपरिषदेतील सर्व जागा आणि थेट नगराध्यक्ष पद स्वबळावर लढवावे अशी एकमुखाने मागणी केली. कार्यकर्त्यांच्या या भावनेला जिल्हा नेतृत्वानेही सकारात्मक प्रतिसाद दिला. त्याच ठिकाणी दुसऱ्या दिवशी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या आणि अर्ज भरून घेण्यात आले, ज्यातून पक्षाने आपला उमेदवार ठरवण्याची तयारी दर्शवली.

दरम्यान, कर्जत तालुक्यात शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपने युतीत निवडणुका लढवण्याचा निर्णय आधीच जाहीर केला होता, पण माथेरानमध्ये हे राजकीय गणित जुळणार का? हे पाहणे महत्त्वाचे कारण, कारण शिंदे गटानेदेखील नगराध्यक्षपदावर दावा केला असून, त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये मैत्रिपूर्ण लढत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राजकीय वर्तुळात आता चर्चा सुरू आहे की, माथेरानमध्ये युतीचे सूत्र ढासळणार का? की शेवटच्या क्षणी तडजोडीचा फॉर्म्युला निघणार? एकंदर, माथेरान नगर परिषदेची निवडणूक थरारक लढतीकडे झुकत असल्याचे संकेत राजकीय वर्तुळात दिले जात आहेत.

# भाजपचे समीर राणे, निखिल चव्हाण यांचे निलंबन मागे

**रेवदंडा : प्रतिनिधी**


भारतीय जनता पार्टीने मागील विधानसभा निवडणुकीत पक्ष आदेशाने काम केले नाही, या कारणास्तव निलंबीत केलेले नागाव चे समिर राणे व अलिबागचे निखलि चव्हाण यांचे निलंबन मागे घेण्यात आले आहे.

भाजपचे जिल्हा अध्यख व खासदार धैर्यशील पाटील यांनी समिर राणे व निखिल चव्हाण यांचे निलंबन मागे घेत असल्याचे पत्र दिले, व त्याचे भाजप मध्ये पुनवर्सन केले. यावेळी भाजपचे पदाधिकारी भाजप माजी तालुका अध्यक्ष उदय काठे, बेलोशी विभाग मंडळ अधिकारी अशोक वारगे आणी भाजप कार्यकर्ते यांची उपस्थति होती. नागावचे समिर राणे व अलिबागचे निखिल चव्हाण यांचे निलबंन मागे घेतल्याने त्यांनी आनंद व्यक्त केला, व भाजप मध्ये काम करण्याची संधी मिळाली असून पुनस्यः जोमाने काम करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य निवडणूका तसेच नगरपालिका, पंचायत समिती निवडूका डोळयासमोर ठेवीत जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी समिर राणे व निखिल चव्हाण यांचे निलबंन मागे घेउन त्यांना काम करण्याची संधी मिळवून दिली.

# भात कापणी, बांधणी करताना विंचू दंशापासून रहा सावध!

**तळा : प्रतिनिधी**

सध्या अवकाळी पाऊस पडत असला तरी सर्वत्र भातशेती पिकून तयार झाली असल्याने भात कापणी बांधणीचा हंगाम सुरू झाला आहे.मात्र भात कापणीच्या हंगामात विंचू दंशाच्या घटनेत देखील वाढ झाली आहे.



यावर्षी परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. लांबलेल्या पावसामुळे भात कापणीला उशिरा सुरुवात झाली असून कधीही पाऊस कोसळत असल्यामुळे घाईघाईनेच भात कापणी केली जात आहे.परंतु भात कापणी करताना अनेकदा बेसावध असल्यामुळे विंचू दंशाचे प्रकार वाढले आहेत.त्यामुळे भात कापणी करताना नागरिकांनी स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे.ज्यामध्ये शेतात काम करताना पायात गमबूट वापरणे, हातात रबरी हॅन्डग्लोज घालणे,डोक्यात टोपी घालणे यांसारख्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. तसेच ग्रामीण भागात बहुतांश वेळा विंचू दंश झाला तर त्याला सुरुवातीला मंत्रिकाकडे विष उतरविण्यासाठी नेण्यात येते मात्र यामुळे उशीर होऊन वेळप्रसंगी त्या रुग्णाच्या शरीरात विष पसरला जाऊन जीवितास धोका निर्माण होतो.

त्यामुळे विंचू दंश झाल्यास रुग्णाला उपचारासाठी त्वरित जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करावे जेणेकरून वेळेवर उपचार झाल्याने त्या रुग्णाचे प्राण वाचतील, असे आवाहन डॉक्टरांकडून करण्यात आले आहे.

# वांगणीमध्ये मालगाडीचे इंजिन बंद पडले

## सकाळी गर्दीच्या वेळी लोकलसेवा विस्कळीत

**नेरळ : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या वांगणी रेल्वे स्थानकाजवळ आज सकाळी मालवाहू गाडीचे इंजिनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने मुंबईकडे जाणाऱ्या गाड्यांची मोठी कोंडी झाली. सकाळी ८.२७ वाजताची कर्जत–सीएसएमटी लोकल यासह सिंहगड एक्सप्रेससह इतर गाड्या ठप्प झाल्याने रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला.तब्बल पन्नास मिनिटानंतर रेल्वे सेवा सुरळीत झाल्या.या अचानक झालेल्या अडथळ्यामुळे चाकरमानी व नोकरदार वर्गाचे चांगलेच हाल झाले.



शुक्रवार ३१ऑक्टोबर रोजी सकाळी कामावर जाण्याची घाई असताना मध्य रेल्वेच्या कर्जत वांगणी स्थानकादरम्यान मुंबई दिशेने निघालेल्या मालवाहतूक ट्रेनच्या इंजिनमध्ये बिघाड झाला.याचा थेट परिणाम मुंबई दिशेने धावणाऱ्या मार्गावरील रेल्वे वाहतुकीवर झाला.मालगाडीच्या पाठोपाठ असणारी कर्जत मुंबई लोकल यामुळे थांबली,काही ट्रेन प्रवासी रेल्वे ट्रकवर उतरल्याचे चित्र होते.

नेरळ रेल्वे स्थानकात ५० मिनिटे सिंहगड एक्सप्रेस थांबून राहिली होती.त्याच बरोबर एक्स्प्रेसच्या मागे आणखी एक कर्जत मुंबई लोकल सकाळच्या सुमारास थांबल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला.


ॲड. आशा अरुणकुमार भगत
मो. ८९०८३५५०००

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दि.चौ अर्ज क्र. १२५८/२०२५
निशाणी क्रमांक
नि. ८
ने.ता. १५/११/२०२५

१. श्रीमती. शैलजा पांडुरंग मोरे
रा. शिवसाई रहिवासी संघ, कन्नमवार नगर २
प्रगती हाईस्कुलच्या मागे, विकोळी (पु) टागोर नगर मुंबई ४०००८३

२. श्री. अजित पांडुरंग मोरे
रा.१०४ ईच्छापुर्ती प्लॉट ३२ सेक्टर ३० डी गोठीवली घणसोली
नवी मुंबई ठाणे ४००७०१

३. श्री. सुजित पांडुरंग मोरे
रा.१९९/७८८१, कन्नमवार नगर २ विकोळी (पु)
टागोर नगर मुंबई ४०००८३

४. सौ. प्राजक्ता पांडुरंग मोरे
रा.२०१, ब्रम्हाराज रेसीडेन्सी प्लॉट नंबर ०९,
सेक्टर ८ अे ऐरोली ठाणे नवी मुंबई ४००७०८.

सदरहु अर्जदार क्र. १ यांचे पती, अर्जदार क्रमांक २ ते ३ यांचे वडिल कै. पांडुरंग देवजी मोरे हे दिनांक ०५/०८/२०२४ रोजी मौजे ऐरोली येथे मयत झाले आहेत. कै. पांडुरंग देवजी मोरे यांच्या आई कै चंद्रीबाई देवजी मोरे हया दिनांक १८/०६/२००९ रोजी मयत झाल्या आहेत त्यांच्या पश्यात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणुन नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब कै. पांडुरंग देवजी मोरे यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरहु अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे :–

कै. पांडुरंग देवजी मोरे (मयत मुळ पुरुष)
↓
कै. चंद्रीबाई देवजी मोरे (मयत मुळ पुरुषाची आई)
↓
श्रीमती. शैलजा पांडुरंग मोरे (मयत मुळ पुरुषाची पत्नी)
↓
श्री. अजित पांडुरंग मोरे (मयत मुळ पुरुषाचा मुलगा)
↓
श्री. सुजित पांडुरंग मोरे (मयत मुळ पुरुषाचा मुलगा)
↓
सौ. प्राजक्ता पांडुरंग मोरे (मयत मुळ पुरुषाची मुलगी)

१. कै. पांडुरंग देवजी मोरे यांच्या मृत्युसमयी त्यांच्या मालकीची व ताबेकब्जातील व त्यांच्या नावाची नोंद असलेल्या मिळकतींचे वर्णन येणेप्रमाणे :–

| अपार्टमेंटचे नाव | सदनिका /गाळा क्रमांक | प्लॉट क्रमांक | सेक्टर क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|---|---|---|
| गणपती आरती कॉफ्लेक्स | सदनिका क्रमांक बी – ६०४ | २ | ८ | १७,१०,००० |

कै. पांडुरंग देवजी मोरे यांनी वरील वर्णनाची मिळकतीचे मालक आहेत. परंतु सदरची व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदारांनी सिडको कार्यालयाकडे व इतर कार्यालयात चौकशी केली असता त्यांना असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे सदनिका / इतर मिळकत आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात म्हणजेच कै. पांडुरंग देवजी मोरे यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर सदनिका हस्तातरण करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रीक बाबींचा अडथळा येवु नये हया कारणास्तव वरील मयत व्यक्तिंचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करुन मागत आहेत सबब सदर अर्जास कारण घडले आहे.

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे वारस दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांचे आत या मे न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे.

दि. ३०/१०/२०२५

सही/–
व. लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

शिक्का

सही/–
सह. अधीक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल


**मुरुड : प्रतिनिधी**

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त मुरूडमध्ये एकता दौड

भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त रायगड पोलीस दलाच्या वतीने मुरुड पोलिस ठाणेतर्फे मुरुड शहरात मुरुड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली एकता दौड चे आयोजन करण्यात आले.

मुरुड तालुक्यांतील धावपटू व क्रीडाप्रेमी तसेच युवा वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पहाटे पोलीस मैदानात वरिष्ठ पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी सहभागी धावपटुंना पटेल यांच्या दूरदृष्टी, राष्ट्राची एकता,अखंडता अबाधित राखण्यासाठीची शपथ दिली यावेळी पोलिस अधिकारी , व्यायाम पटु व विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थिती दर्शवली होती.


## पेण नगरपरिषद, पेण

जिल्हा–रायगड

कार्यालयः०२१४३–२५२०२३ अध्यक्ष कार्यालय: ०२१४३–२५२०६३
मुख्याधिकारी: ०२१४३–२५२८२४ फॅक्स: ०२१४३–२५२१८३
Email:copenme@gmail.com

जा.क्र.पेनप/का.१/सार्वत्रिक निवडणूक –२०२५ दिनांक– ०५/१०/२०२५

**पेण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**अंतिम मतदार यादी प्रसिद्धी**
**जाहिर सूचना**

या जाहिर सुचनेद्वारा सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांचे आदेशान्वये पेण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणू २०२५ ची अंतिम मतदार यादी दि.३१/१०/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची नोंद घ्यावी. सदर प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या दि.३१/१०/२०२५ पासून नगरपरिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ठिकाण :– पेण नगरपरिषद कार्यालय
दिनांक :– ३१/१०/२०२५
जा.क्र.पेनप/का.१/सार्वत्रिक निवडणूक –२०२५ – २५०८

सही /-
( जीवन ल.पाटील)
मुख्याधिकारी
पेण नगरपरिषद, पेण



## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे आजिवली, तहसील– पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार १. अस्मीता आत्माराम खाने २. जगदीश मारूती खाने ३. नेहा आत्माराम खाने ४. संगिता आत्माराम खाने, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:–

**शेतजमीनीचे वर्णन**
**मौजे आजिवली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | | हे. आर. प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू. पै |
| ३ | १ | ०–६७–०० | ०–५–८० | ०–७२–८० | १४.०६ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ३१/१०/२०२५

कार्यालयीन पत्ता
शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स तहसिदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क :– ८८८८२७१७५९

सही/–
ॲड. स्वप्निल व्यं जाधव
बी.ए.एल.एल.बी.
( खरेदीदारचे वकिल)



## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that my clients. **Mr. ABHIRAM SADASHIV and Mrs. NEHA SANJAY SINGH,** Both adults, Indian inhabitant of Flat No. A-801. Bhoomi Gardenia 2, Sector 20, Kalamboli 410218, (hereinafter referred to as "my clients") has entered into Agreement For Sale dated 08/10/2025 with **Mr. PRAKASH RAGHUNATH TAYADE and Mrs. SUNANDA PRAKASH TAYADE**, Both adults, Indian inhabitant of Row House No. F-57, Sector 12, Kharghar, Navi Mumbai - 410210, (herein after referred to as the "other party") for the purchase of the Row House along with Plot situated thereon (herein after referred to as the "said property"), owned and occupied by the "other party". being and lying at **KHARGHAR, NAVI MUMBAI** and more particularly described in the "Schedule of property" written hereunder.

**Mr. PRAKASH RAGHUNATH TAYADE and Mrs. SUNANDA PRAKASH TAYADE are owners of ROW HOUSE NO. F-57, SECTOR 12, KHARGHAR, NAVI MUMBAI-410210** (herein after referred to as the "said property").

If anyone has any claim, such as through Mortgage, Lien, court matters such as suit, claim, dispute, petition, appeal, proceedings, decree, award or any orders, legal heirs, or any other rights, please visit my office in person between 11 AM to 5 PM. Submit the supporting documents for your claims to the authorized signatory below. This must be within 7 days of this paper public notice, failing which "my clients" will presume that no adverse claims or objections concerning the "said property" exist or if they do exist, they stand waived hereinafter, and in such event "my clients" will proceed to complete the transaction of sale as envisaged by both the parties. So please do note.

**Date: 31/10/2025**

**SD/-**
**ADITYA R. KATAKDOUND**
(BBA.LL.B (HONS.))
ADVOCATE, BOMBAY HIGH COURT & LEGAL CONSULTANTS

**Office Address: Khargharcha Raja Ganesh Mandir (Basement), Opp. Gokhale School, Sector 12, Kharghar, Navi Mumbai-410210.**
**Contact No. 9594962207.**



## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन – ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई–मेल: coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in,
वेबसाइट: kbmc.gov.in.

जा.क्र. : कुबनप/शहर स्वच्छता विभाग/२१०/२०२५–२६ दिनांक :- ३१/१०/२०२५

**शहर स्वच्छता विभाग**
**जाहिर फेर निविदा सुचना**

कुबनप क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांच्यावर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे व त्यांना रेबीज प्रतिबंधक लस देणे तसेच मांजरांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणे या कामाकरिता निविदाफॉर्म दिनांक:– ०१/११/२०२५ ते दिनांक:–०९/११ /२०२५ पर्यंत ई–टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या कुबनप संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in प्राप्त होतील. निविदाफॉर्म फी व निविदा अनामत फी ऑनलाईन भरणेचे आहे. निविदाफॉर्म ऑनलाईन विकत घेता येईल. निविदेचे सादरीकरण दिनांक:–०८/११/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर online सादर करणेचे आहे.

वरील प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या निविदा दिनांक:– १०/११/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. किंवा अन्य सोयीच्या दिवशी निश्चित होईल त्या दिवशी दालनात उपस्थित संस्थांचे प्रतिनिधी / कंत्राटदार अथवा अधिकृत प्रतिनिधी समोर उघडण्यात येतील. कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/–
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगाव



## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री. किशोर रामदास सोनवणे.. प्लॉट नं. १, सेक्टर १५, रसेश्वर को. ऑप. हौसिंग सोसायटी नवीन पनवेल, ता. पनवेल जि. रायगड | ०१ आंबा ताडेणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.– १, सेक्टर १५, रसेश्वर को. ऑप. हौसिंग सोसायटी नवीन पनवेल. ता. पनवेल जि. रायगड येथे बंगला नं. ८ च्या आवारातील ०१ आंबा झाड हे धोकादायक पडण्याच्या स्थितीत असून सदर झाडाची मुळे बंगल्याच्या संरक्षण भिंतीमध्ये गेली असल्याने भिंत पडण्याची शक्यता आहे |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करण्यास वरील अर्धानियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र.:–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ५५३/५७५/२०२५
दिनांक :– ३१/१०/२०२५

सही/–
उपायुक्त
तथा वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

# वीजबिलांच्या ग्राहक नावातील बदल अर्जांना आता स्वयंचलित मंजुरी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



दर्जेदार व तत्पर ग्राहकसेवेसाठी महावितरणने वीजबिलांच्या ग्राहक नावातील बदल (Change of Name) करण्याच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजूरी देण्यास सुरवात केली आहे. आवश्यक कागदपत्रे अपलोड करून प्रक्रिया शुल्काचा भरणा केल्यानंतर केवळ तीन ते सात दिवसांमध्ये वीजबिलावरील ग्राहक नावामध्ये बदलाची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. यापूर्वी या प्रक्रियेस कृती मानकानुसार एक महिन्याचा कालावधी लागत होता.

राज्याचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीजग्राहकांना तत्पर व घरबसल्या सेवा देण्यासाठी महावितरणच्या डिजिटल सेवेत ग्राहकाभिमुख बदल करण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी बिलावरील ग्राहक नावात बदल करण्याच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजूरी देण्याचा निर्णय घेतला.

त्यासाठी नुकतीच ऑनलाइन प्रणाली विकसित व कार्यान्वित करण्यात आली आहे. खरेदी-विक्री, वारसा हक्क किंवा इतर कारणांमुळे घर किंवा इतर मालमत्तेच्या मालकीमध्ये बदल झाल्यानंतर वीजबिलाच्या ग्राहक नावात बदल करण्यासाठी अर्ज करण्यात येतो.

या प्रक्रियेसाठी महावितरण मोबाईल ॲप www.mahadiscom.in या संकेतस्थळावर वीजग्राहकांना 'लॉग-इन'द्वारे ऑनलाइन अर्ज सादर करणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे व प्रक्रिया शुल्क (Processing Fee) भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. ग्राहकांचे अर्ज, छाननी व मंजूरी या प्रक्रियेसाठी मा. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या कृती मानकांप्रमाणे एक महिन्याचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

आता महावितरणकडून या अर्जांना स्वयंचलित मंजूरी मिळत असल्याने नावात बदल करण्याची कार्यवाही केवळ तीन ते सात दिवसांमध्ये पूर्ण होणार आहे. ग्राहक नावात बदल करण्याचा ऑनलाइन अर्ज व अपलोड केलेल्या कागदपत्रांची संबधित उपविभाग कार्यालयाकडून तपासणी होईल. त्यात काही त्रुटी आढळल्यास संबंधित ग्राहकांना लगेचच नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे कळविण्यात येईल. सोबतच ग्राहक नावात बदल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याचा संदेशही ग्राहकांना पाठविण्यात येईल.

ग्राहक नावात बदल करण्याच्या अर्जांना स्वयंचलित मंजूरी मिळणार असल्याने प्रामुख्याने घरगुती ग्राहकांसह इतर ग्राहकांना महावितरणच्या डिजिटल सेवेचा तत्पर लाभ होणार आहे. महावितरणने याआधी लघुदाब वर्गवारीतील सर्व औद्योगिक, व्यावसायिक, घरगुती व इतर ग्राहकांच्या १५७ केडब्लूपर्यंत वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित पद्धतीने मंजुरी देण्यास प्रारंभ केला आहे.

त्याचा वीजग्राहकांना मोठा लाभ झाला आहे. आता वीजबिलांवरील ग्राहक नावात बदल करण्याची मंजूरी स्वयंचलित केल्याने डिजिटल ग्राहकसेवेत महावितरणने मोठी आघाडी घेतली आहे.

# स्वस्त किराणा पुरविण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या पती-पत्नीस अटक

**पनवेल: वार्ताहर**





स्वस्त किराणा व घरगुती सामान पुरविण्याचे अमिष दाखवून विविध ठिकाणी फसवणूक करणा-या पती पत्नीस पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्या अटकेमुळे अनेक फसवणुकीचे गुन्हे उघडकीस येणार आहेत.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील वेगवेगळ्या सोसायटीत भाडयाने घर घेवून राहणारे आरोपी पती पत्नी नवीन धनाजी पांचाळ (वय ५२) व विद्या नवीन पांचाळ (वय ४५) यांनी तालुक्यातील हेदुटणे व पाले बुद्रुक येथील काही लोकांना स्वस्त दरात होलसेल किराणा सामान, कपडे व घरगुती वस्तू देण्याचे आमिष दाखवून प्रथम त्यांना काही सामान स्वस्तात पुरवून त्यांची फसवणूक करण्याचा हेतूने त्यांचा विश्वास संपादन करुन तसेच त्यांना किराणा व घरगुती सामानाचा स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याचे आमिष दाखवून त्यांचेकडून सामानासाठी मोठी रक्कम ऑनलाईन व रोखीने एकूण ५,०५,२८५/- रक्कम स्विकारुन किराणा सामान न पुरवता तसेच घेतलेले पैसे देखील परत न देता मोबाईल फोन बंद करुन व घर सोडून निघून गेले व त्यांनी तेथील रहिवाश्यांचा विश्वासघात करुन फसवणूक करुन पळून गेले होते.

याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करताच पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त संजय येनपुरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पनवेल प्रशांत मोहिते, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) आनंदा कांबळे, गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे सहा. पोलीस निरीक्षक अनुरुध्द गिजे, पोलीस उप निरीक्षक हर्षल राजपुत, पोहवा विजय देवरे, पोहवा महेश धुमाळ, पोहवा सुनिल कुदळे, पोहवा सतिष तांडेल, पोहवा शिवाजी बाबर, पोहवा भुषण म्हारसे, पोशि आकाश भगत, पोशि भिमराव खताळ आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे आरोपीना आळंदी, पुणे येथून अटक केली.

या आरोपींची वेगवेगळे मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी, वेगवेगळे बँक खाते वापरुन तसेच वेगवेगळया पत्त्यांवर भाडयाने घर घेवून नमुद गुन्हयातील अनेकांची फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या आरोपींविरोधात वाठोडे पोलीस ठाणे, नागपूर शहर आणि कल्याण तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल असून वाठोडे पो. ठाणे, नागपूर येथील गुन्हयात दोन्ही आरोपीत फरार आहेत. यांच्या अटकेमुळे अजूनही अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

# राष्ट्रीय स्वच्छोत्सव स्वच्छता जनजागृती प्रश्नमंजुषा स्पर्धेत लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयाचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या स्वच्छोत्सव स्वच्छता मोहिमेंतर्गत प्रथम एज्युकेशन फाउंडेशनने गुरुशालेच्या सहकार्याने कचरा व्यवस्थापन जनजागृती मोहीम यशस्वीपणे राबवली. हा उपक्रम विशेष मोहीम ५.० अंतर्गत शिक्षण मंत्रालय (उच्च शिक्षण विभाग) च्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, आसाम, तामिळनाडू , जम्मू आणि काश्मीर या पाच राज्यांतील शाळांनी भाग घेतला होता.

या मोहिमेचा उद्देश कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत पर्यावरणीय पद्धतींबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढवणे हा होता. हा कार्यक्रम ऑनलाइन सत्रे, संवादात्मक प्रश्नमंजुषा आणि थेट सादरीकरणाद्वारे आयोजित करण्यात आला. जेणेकरून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व व्यावहारिकरित्या समजू शकेल. मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात, पाच राज्यांतील ४६जिल्ह्यांतील २०००हून अधिक विद्यार्थ्यांनी स्वच्छोत्सव स्वच्छता प्रश्नमंजुषामध्ये भाग घेतला.



ज्या जिल्ह्यांच्या विद्यार्थ्यांनी मूल्यांकनानंतर सर्वोत्कृष्ट कामगिरी केली त्यात फिरोजाबाद, रायगड, जालौन, वाराणसी, बुलंदशहर, पिलीभीत, लखीमपूर खेरी, मुरादाबाद आणि बस्ती यांचा समावेश आहे, दुसरा टप्पा आज, ३० ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये १२ अंतिम फेरीतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पना आणि ज्ञानाचे प्रदर्शन केले. यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करून राष्ट्रीयस्तरावर विद्यालयातील इयता १० वी क मधील सत्यम राजेश धुमाळ याने तृतीय क्रमांक मिळवला. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष सन्मान व पारितोषिकेगुरुशालातर्फे देण्यात येणार आहेत. हा उपक्रम केवळ स्वच्छोत्सव स्वच्छता मोहिमेच्या उद्दिष्टांनाच बळ देत नाही, तर राज्य आणि केंद्र सरकारच्या शैक्षणिक भागीदारांमधील सहकार्य देखील मजबूत करतो. या स्पर्धेसाठी विद्यालयातील अनिल पाटील यांनी मार्गदर्शन केले.

सत्यमच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी कोंगेरे एम.के.,विद्यालायचे स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन जयदास गोवारी, व्हाईस चेअरमन विनायक म्हात्रे यांनी कौतुक केले.

# सोनारी येथे ज्येष्ठ नागरिक संघाचा नववा वर्धापन दिन

**उरण : बातमीदार**

ज्येष्ठ नागरिकांचे समस्या सोडविण्यासाठी सोनारी गावात स्थापन झालेल्या जेष्ठ नागरिक संघातर्फे आजपर्यंत अनेक विविध उपक्रम कार्यक्रम राबविण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांचे अनेक समस्या सोडविण्यात आल्याने सदर संस्थेचे नाव सर्वांनाच सुपरिचित झाले आहे. उरण तालुक्यातील सोनारी येथे मंगळवारी ज्येष्ठ नागरिक संघाचा नववा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात प्रमुख पाहुण्याच्या हस्ते वर्धापन दिनाचा केक कापून साजरा करण्यात आला.



या वेळी प्रमुख पाहुणे वादळवारा दैनिकाचे संस्थापक संपादक दा. चां. कडू (गुरुजी) उपस्थित होते. त्यांच्यासोबत रायगड भूषण प्रा. एल. बी. पाटील, उरण तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रमाकांत म्हात्रे, करळ गावचे डॉ. अविनाश तांडेल, न्हावा - शेवा पोलिस स्टेशनचे पीएसआय शांताराम लेंढे, सुजाता दिनेश कडू, ग्रा.पं. सदस्या व सोनारी गावचे अध्यक्ष अजय म्हात्रे इत्यादी उपस्थित होते.

या कार्यक्रमाला उपाध्यक्ष रोहिदास पाटील, खजिनदार सुभाष कडू, सेक्रेटरी एन. आर. कडू, सदस्य प्रभाकर कडू, के. के. कडू, केशव तांडेल, केशव कडू, रामकृष्ण तांडेल, हरिश्चंद्र कडू, भरत रसाळ, हरी तांडेल, प्रभाकर तांडेल उपस्थित होते.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त कोकण भवनात अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ विभागीय महसूल कार्यालयाच्या बैठक सभागृहात सकाळी ११.०० वाजता तहसीलदार (सामान्य प्रशासन ) नरेश जगताप यांच्या उपस्थितीत अधिकारी/ कर्मचारी यांनी घेतली.

दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त देशात राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी त्यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने हा दिवस भव्य स्वरुपात साजरा केला जाणार आहे. म्हणून दि. ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत भारत पर्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मी राष्ट्राचे एकता, अखंडता व सुरक्षा अबाधित राखण्यासाठी स्वत:ला समर्पित करीन, सरदार वल्लभभाई पटेल यांची दूरदृष्टी व कार्यामुळे देशाची एकता राखणे शक्य झाले. तसेच मी माझ्या देशाची अंतर्गत सुरक्षा अबाधित ठेवण्याकरिता माझे स्वत:चे योगदान देण्याचा सत्यनिष्ठापूर्वक संकल्प करीत आहे. अशी राष्ट्रीय एकता दिनानिमित्त शपथ घेतली. विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# सानपाड्यात घे भरारी कार्यक्रम

**नवी मुंबई :बातमीदार**

सहकार भारती व नवनीत प्रतिष्ठानच्या वतीने सानपाडा मध्ये नारीशक्ती जागरण व सन्मान सोहळा 'घे भरारी' चे आयोजन. नवनीत प्रतिष्ठान नवी मुंबई त्याचप्रमाणे सहकार भारती नवी मुंबईच्या वतीने रविवार, दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २:०० ते ४:०० यावेळी महिलांसाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षपद महाराष्ट्र प्रदेश सहकार भारती बचत गट प्रकोष्ठ सह प्रमुख जया अलीमचंदानी भुषवणार आहेत. महिलांच्या व्यवसाय वाढीसाठीच्या विविध प्रकारच्या योजना आणि सवलती यांची माहिती जिल्हा संसाधन अधिकारी दीपा राऊत मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये सहकार भारती महिला प्रमुख संगीता बांगर यांचा महत्त्वाचा सहभाग असणार आहे. या कार्यक्रमासाठी कोकण विभाग सह प्रमुख विणा मोकाशी त्याचप्रमाणे नवी मुंबईचे सहकार भारतीचे अध्यक्ष प्रमोद जोशी उपस्थित राहतील.

सानपाड्यातील हा कार्यक्रम महिलांमध्ये औद्योगीक साक्षरता निर्माण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला असून या कार्यक्रमांमध्ये विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांचा सन्मान देखील करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरण करणे त्याचप्रमाणे इतर महिलांच्या समोर योग्य प्रकारचा आदर्श ठेवणे अशा प्रकारचा उद्देश आहे. या कार्यक्रमासाठी सहकार भारती नवी मुंबई त्याचप्रमाणे नवनीत प्रतिष्ठान यांचे सर्व कार्यकर्ते प्रयत्नशील राहतील अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष कडू त्याचप्रमाणे सचिव संतोष मिसाळ यांनी दिली.

# नवी मुंबईतील जनता दरबारात ४०४ निवेदने सादर



**नवी मुंबई : बातमीदार**

राज्याचे वनमंत्री नामदार गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात जनता दरबार पार पडला. या जनता दरबारात नागरिकांनी विविध विषयांवर ४०४ निवेदने सादर केली. ७० टक्के निवेदनांवर तात्काळ कार्यवाही करून नागरिकांना दिलासा देण्यात आला. यावेळी पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे उपस्थित होते.

सानपाडा सह शहरातील अन्य भागातून आलेल्या नागरिकांनी पाणीटंचाईचा दूर करण्याचे निर्देश वनमंत्र्यांनी दिले. सिडकोने कोणालाही नियमबाह्य नोटीसा न देण्याचे निर्देश वनमंत्री नाईक यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना दिले. सुनील पगार यांच्यासह नवी मुंबईतील कलाकारांनी विष्णुदास भावे नाट्यगृहातील तालीम हॉल सवलतीच्या दरामध्ये उपलब्ध करून दिल्याबद्दल वनमंत्र्यांचे आभार मानले. पवन कोळी या युवकाला महावितरणमध्ये नोकरीवर घेण्याची प्रक्रिया नाईकांच्या सूचनेनंतर सुरू झाली आहे. नेरूळ येथील शैलेश तांबे उदरनिर्वाहासाठी दुधाची एजन्सी मिळावी याकरता प्रयत्नशील होते.

# उरण ओएनजीसी प्लांटच्या वतीने शालोपयोगी वस्तूंचे वाटप

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे द्रोणागिरी हायस्कूल करंजा मराठी व सेमी इंग्रजी माध्यम या विद्यालयात बुधवार ( दि.२९ ) रोजी रोजी ओएनजीसी प्लांट उरण यांच्या सीएसआर फंडातून विद्यार्थ्यांना स्कूल बॅग आय कार्ड रेनकोट स्कूल युनिफॉर्म स्पोर्ट युनिफॉर्म शूज तसेच विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण योग्यरित्या घेता यावे यासाठी दहा संगणक सेट इन्व्हर्टर एसी इत्यादी साहित्य देण्यात आले

# कर्मचारी भविष्य निर्वाह निधी रोजगार योजना मेळावा

**नवी मुंबई : बातमीदार**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना, प्रादेशिक कार्यालय, वाशी यांनी प्रधानमंत्री विकासित भारत रोजगार योजना या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते. भारत सरकारने अलीकडेच मंजूर केलेल्या प्रधानमंत्री विकासित भारत रोजगार योजना बाबत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना , प्रादेशिक कार्यालय, वाशी यांनी रोहा इंडस्ट्रीज असोसिएशन, रोहा येथे एक चर्चासत्र आयोजित केले होते. २७ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या या कार्यक्रमाचे उद्दिष्ट नियोक्त्यांना योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या फायद्यांची माहिती देणे आणि तरुणांसाठी रोजगाराच्या संधींना प्रोत्साहन देणे होते.

याप्रसंगी, प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त-१, डॉ. रामकृष्ण त्रिपाठी यांनी योजनेच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. रोहा इंडस्ट्रीज असोसिएशनचे कार्यकारी संचालक दयानंद नांदगावकर यांनी त्यांचे विचार मांडले. या कार्यक्रमाला सुमारे २९ नियोक्ते उपस्थित होते आणि त्यांनी योजनेअंतर्गत मिळणारे फायदे, पात्रता निकष आणि प्रक्रियांबद्दल सविस्तर माहिती घेतली.



**मुंबई :** केंद्रीय बंदर व जलमार्ग विभागाचे कॅबिनेट मंत्री सर्वानंद सोनोवाल, राज्यमंत्री शांतनु ठाकूर, इंडियन पोर्ट्स असोसिएशनचे व्यवस्थापकीय संचालक विकास नरवाल, मुंबई बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष एम. अंगमुथु, जेएनपीए अध्यक्ष गौरव दयाल आणि कोचीन बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष बी. काशिविस्वनाथनी यांची भारतीय पोर्ट व डॉक मजदूर महासंघाच्या शिष्टमंडळाने, इंडिया मेरीटाईम वीक २०२५, नेस्को कन्व्हेन्शन सेंटर, गोरेगांव, मुंबई येथे भेट घेऊन बंदर कामगारांच्या प्रलंबित राहिलेल्या प्रश्नांवर, विविध मुद्द्यांवर चर्चा केली. यावेळी भारतीय पोर्ट व डॉक मजदूर महासंघाचे महासचिव सुरेश पाटील, मुंबई पोर्ट ट्रस्ट मजदूर संघ युनियनचे कार्यकारी अध्यक्ष प्रवीण मंचेकर, महासचिव दीपक जाधव, ज्ञानेश्वर सोनवणे व जयवंत चौलकर हेही उपस्थित होते.

# पद्मदुर्ग संवर्धनसाठी दोन कोटींचा निधी मंजूर

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

अनेक वर्ष प्रतीक्षेत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ले पद्मदुर्ग संवर्धनाचा विषय खासदार सुनील तटकरे यांनी केंद्र शासनकडे पाठपुरावा करून दोन कोटी रुपयांचा निधी संवर्धनसाठी मंजूर केल्याची माहिती पत्रकाराना व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे दिली. लवकरच या कामाला सुरवात होईल आणि मुरूडकरांना व पर्यटकांना शिवरायांच्या किल्ल्यावर सहज जाता येणार आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना सोबत राष्ट्रवादीचे मुरुड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, प्रमुख नेते मनोज भगत, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, माजी सरपंच अजित कासार, महिला तालुका अध्यक्ष ॲड.मृणाल खोत, मुरुड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, सचिव विजय पैर, अजित गुरव, राजपुरी उपसरपंच इस्माईल सिद्दीकी आदी उपस्थित होते.

शिवरायांच्या पद्ममदुर्ग संवर्धनची मागणी मुरुड पत्रकार संघ, महाडचे शिवप्रेमी कोकणकडा व मुरुडच्या पद्मदुर्ग जागर समिती यांनी गेली अनेक वर्ष सातत्याने केल्याने आज त्याला यश आले. हे काम रायगडचे खासदार तटकरे यांनी केले आहे.



प्रमुख मागणी अशी आहे की, मुरुडच्या समुद्रकिनाऱ्यावरून छोट्या बोटीतून १० मिनिटांत पद्मदुर्ग किल्ल्यात पर्यटकांना जाता यावे त्यासाठी एक जेटी मुरुड समुद्रकिनारी असावी, तर दुसरी फॉलइटिंग जेटी किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ असावी. मुरुड किनारी फिरताना समोर दिसणारा पद्मदुर्ग किल्ला पर्यटकांचे आकर्षण होणार आहे. त्यामुळे मुरुडच्या तरुणवर्गाला विविध प्रकारची कामे मिळतील, स्वयंरोजगार निर्माण होईल.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सिद्दीवर धाक बसावा म्हणून या किल्ल्याची बांधणी केली. महाराजांनी बांधलेल्या जलदुर्ग किल्ल्यांपैकी पद्मदुर्ग किल्ला महत्त्वाचा आहे. महाराजांनी आणखी काही जलदुर्ग बांधले. त्यापैकी म्हणजे सिंधुदुर्ग किल्ला, कुलाबा किल्ला आदी आहेत.

जंजिरा किल्ल्यावरून पद्मदुर्गकडे जाण्यासाठी आपल्याला बोटमध्ये जावे लागे. दुर्ग जवळ असलेल्या जंजिरा किल्ल्यामुळे सिद्दी अतिशय प्रबळ झाला होता. सिद्दीच्या आरमारीच्या सामर्थ्याने त्याने किनारपट्टीवर दरारा निर्माण केला होता. सिद्दीच्या अत्याचाराला थांबवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी मुरूडच्या समुद्रामध्ये कासव आकाराच्या असलेल्या बेटावर पद्मदुर्ग किल्ला बांधण्याचा निर्णय घेतला. पद्मदुर्गचे दुसरे नाव कासा किल्ला असेपण म्हणतात. पद्मदुर्ग किल्ल्याचे बांधण्याचे काम सन १६७६ मध्ये झाले.

पद्मदुर्ग किल्ल्याबद्दल छत्रपती शिवाजी महाराज म्हणतात की, पद्मदुर्ग वसवून राजापुरीच्या (जंजिरा) उरावरी दुसरी राजापुरी उभी केली आहे. पद्मदुर्ग किल्ल्याचे दोन भाग आहेत. एक मुख्य किल्ला आणि त्यासमोरील पडकोट असे आहे. पडकोट मोठ्या प्रमाणावर नाहीसा झालेला, पण मुख्य किल्ल्याची तटबंदी अजूनही उत्तम पणे चांगली आहे. पडकोट हा शत्रूला चकवण्यासाठी बांधला गेलेला आहे.

पद्मदुर्ग किल्ल्याची वैशिष्ट्य म्हणजे तटबंदीच्या दोन दगडांमधे सिमेंटिंग म्हणून चुना वापरला आहे, परंतु साडेतीनशे वर्षापासून असलेले दगड सागराच्या खाऱ्या पाण्याने तटबंदीचा दगड एकदम भिजून गेला, मात्र चुना अजूनही चांगला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेले जलदुर्गपण आपल्याला चकित होण्यासारखे आहे. या बुरुजाच्या वरचा भाग फुललेल्या कमळाच्या पाकळ्याप्रमाणे दिसून येतो. म्हणूनच याला पद्मदुर्ग असे नाव दिले गेले असावे. खऱ्या अर्थाने किल्याच्या संवर्धन कामाला सुरवात होईल तो दिवस मुरुडकरांसाठी सोन्याचं दिवस होणार आहे. यामुळे शिवप्रेमींना एक चांगला किल्ला पाहण्याची संधी मिळणार आहे, तर स्थानिकांना रोजगाराचा एक नवा मार्ग प्राप्त होईल, असे बोलले जात आहे.

## रोहा तालुक्यात भातशेतीचे नुकसान

**रोहा : प्रतिनिधी**

यावर्षी चांगला पाऊस पडला. त्यामुळे भातशेती चांगली बहरलेली होती. चांगले उत्पादन मिळेल असे बोलले जात असताना परतीच्या प्रवासाने रोहा तालुक्यात हाहाकार माजवल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मोठ्या प्रमाणात गेले आठवड्यावर सायंकाळी रोहा तालुक्यात पाऊस पडत आहे. त्यामुळे कापलेल्या भातशेतीचे नुकसान झाले आहे, तर उभे असलेले भातपीक आडवे झाले आहे. या नुकसानीची भरपाई मिळावी, अशी मागणी शेतकरीवर्गाकडून होत आहे.

कृषी विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार रोहा तालुक्यात साडेसहा हजार हेक्टर क्षेत्रावर भातपिकाची लागवड झालेली होती. लांबलेल्या पावसामुळे बहुतांशी भागात शेतकऱ्यांचे नुकसान झाला आहे. कापलेला भात पाण्यात भिजले आहे, तर कापणीला आलेला भात आडवे झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



रोहा तालुक्यात अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका चणेरा, खांब, देवकान्हे, धानकान्हे, तळाघर, लांडर, वाशी, पळस, शेतपळस,नागोठणे या भागाला बसला आहे. यासह अन्य भागातही शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

ऑक्टोबर महिन्यात आलेल्या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील १२० वर गावांतील शेतकऱ्यांना फटका बसला आहे, तर २७००पेक्षा जास्त शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

ऑक्टोबरमध्ये आलेल्या पावसामुळे अंदाजे ९५० हेक्टर भातशेतीचे नुकसान झाले आहे. कृषी विभागाकडून नुकसानीचे पंचनामा सुरू असल्याचे तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी सांगितले.

---

## बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती

### खालापूर येथे आदिवासी महिलांचा प्रतिसाद

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर येथील आदिवासी भवन येथे बाल विवाह रोखण्यासाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या वेळी ॲड. मिलिंद सुरावकर यांनी आदिवासी व त्यांचे हक्क, कर्तव्ये या विषयावर मार्गदर्शन केले. ॲड.वाडेकर यांनी विधी पोक्सो व बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६बाबत माहिती दिली. बाल विवाहांना प्रोत्साहन देणाऱ्यांनाही शिक्षा, दंड होतो याकडे लक्ष वेधण्यात आले. दिप्ती रामरामे यांनी महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची माहिती, तर जिल्हा प्रकल्प समन्वयक प्रकाश पवार यांनी बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा दिली.

कार्यक्रमास महिला व बाल विकास, आदिवासी विकास प्रकल्प, सखी केंद्र, आदिवासी सामाजिक कार्यकर्ते, संस्था यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन आदिवासी नेते दिलीप डाके यांनी केले होते.



## परीक्षा शुल्क माफ करण्याची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

राज्यातील बहुतांशी जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी व पुराचा फटका बसला आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार बाधित आपद्ग्रस्तांना विशेष मदत व सवलती अंतर्गत दहावी व बारावी परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते किरण हाडप याने गटशिक्षण अधिकाऱ्यांकडे केली आहे.

राज्यातील २५३ तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. राज्य शासनाने विशेष मदत व सवलती अंतर्गत निवड केलेल्या तालुक्यांमध्ये रायगड जिल्ह्यातील खालापूरचादेखील समावेश आहे. त्या अनुषंगाने दहावी व बारावी परीक्षांचे शुल्क माफीसाठी हाडप यांनी खालापूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांना लेखी निवेदन दिले असून हे निवेदन रायगड जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्यांना पाठवण्यात आले आहे.

## सुधागडातील भातपीक नुकसानीची पाहणी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील विविध गावांमध्ये अवकाळी पावसामुळे झालेल्या भात पीक नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम यांनी केली. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी आणि शासनस्तरावर योग्य कार्यवाहीसाठी हा दौरा आयोजित करण्यात आला होता.



पाहणी दौऱ्यात मंडळ कृषी अधिकारी पाली व परळी तसेच सर्व उप कृषी अधिकारी तसेच सर्व सहाय्यक कृषी अधिकारी उपस्थित होते. या दौऱ्यात राबगाव, तोरणगाव, पावसाळवाडी, गौलमाळ, कुंभारशेत, राबगाव, वाकणगाव, मौजे झाप, मौजे कासरवाडी, नानोसे, नेरे, उसाळे या गावांतील शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये प्रत्यक्ष जाऊन भातपीक नुकसानीची नोंद घेण्यात आली.

या वेळी तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे स्वरूप स्पष्ट केले आणि भरपाईसाठी आवश्यक कार्यवाही तातडीने केली जाईल, असे आश्वासन दिले. त्यांनी शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली आणि मदतीसाठी प्रशासन सज्ज असल्याचे सांगितले. या पाहणी दौऱ्यामुळे शेतकऱ्यांमध्ये दिलासा निर्माण झाला असून, शासनाकडून वेळेवर मदत मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

## गणेशोत्सव सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली शहरामध्ये भारतीय जनता पक्षातर्फे नेते प्रकाश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा पक्ष कार्यालयात पार पडला. उत्कृष्ट देखावे सादर केलेल्या स्पर्धकांना या वेळी पारितोषिके व चषक प्रदान करण्यात आले.



पालीत भाजपचा उपक्रम

या कार्यक्रमास पालीचे नगराध्यक्ष पराग मेहता, भाजप शहराध्यक्ष सुशील शिंदे, महिला तालुकाध्यक्ष प्रणाली शेठ, समृद्धी बारस्कर, सरचिटणीस वैभव जोशी, फणसे, विराज पानकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या उपक्रमातून गणेशोत्सवाच्या पारंपरिक उत्सवाला सामाजिक सौंदर्याची जोड मिळाली असून स्थानिकांनी स्पर्धेला प्रतिसाद दिला.

**स्पर्धेतील विजेते**
**प्रथम क्रमांक : राजन अंबिके**
**द्वितीय क्रमांक : सागर खंडागळे**
**तृतीय क्रमांक : अभिजीत ठोंबरे**
**चतुर्थ क्रमांक : सुमित सुरेश बेलोसे**

## महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेतर्फे वृद्धांसोबत दिवाळी साजरी

**नागोठणे : बातमीदार**

विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेल्या पेण येथील महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेच्या वतीने अहिल्या वृद्धाश्रमातील वृद्धांची भेट घेऊन त्यांना ब्लँकेट व फळे देऊन अतिशय उत्साहात त्यांची दिवाळी साजरी करण्यात आली. या वेळी वृद्धांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पहावयास मिळाला.

दिवाळीचा सण नुकताच उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. या अनुषंगाने एक आपुलकीची व सामाजिक भावना जपत पेण येथील महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेच्या वतीने अहिल्या वृद्धाश्रमाला भेट देऊन पुढील काही दिवसांत सुरू होणाऱ्या थंडीपासून वृद्धांचे संरक्षण होण्यासाठी ब्लँकेट तसेच सोबत फळे देऊन आशीर्वाद घेण्यात आले.

या वेळी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे पेण शहर अध्यक्ष प्रणेश पोवळे, तालुका मुख्य सल्लागार वैभव चोणकर, तालुकाध्यक्ष योगेश म्हात्रे, उपशहराध्यक्ष संदीप पाटील, उपतालुका अध्यक्ष चंदन अहिरे, महिला तालुकाध्यक्ष शैला तुरे, पियुष रामधरणे, सदस्य सचिता रागटी, हरिश्चंद्र तांडेल, आदी उपस्थित होते.



## ललित कदम माणगाव रत्न पुरस्काराने सन्मानित



**माणगाव : बातमीदार**

स्व.लोकनेते अशोक साबळे यांच्या नवव्या स्मृतिदिनानिमित्त माणगाव येथे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या वेळी माणगावमधील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

ललित कदम याने मागील चार वर्षात क्रीडा क्षेत्रात (जलतरण) चांगली कामगिरी करत जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर गोल्ड, सिल्वर आणि ब्राँझ पदके मिळवून तालुक्याचे नाव प्रकाशझोतात आणले आहे. या कौशल्याची दखल घेऊन गांधी हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमात ललितला माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते आणि विविध मान्यवरांच्या उपस्थितीत क्रीडा क्षेत्रातील माणगाव रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## झोका झाडाले टांगला...!

### शेत शिवारात सुगरण पक्ष्यांची घरटी पक्षीप्रेमींना पर्वणी

**माणगाव : प्रतिनिधी**

शेत शिवारात सुगरण पक्ष्यांनी मोठ्या प्रमाणात घरटी बांधली असून पक्षीप्रेमींसाठी ही एक मोठी पर्वणी ठरत आहे. जैवविविधतेने नटलेल्या रायगड जिल्ह्यात पावसाळ्यानंतर सर्वत्र विविध प्रकारच्या वनस्पती, गवत, फुलझाडे उगवली आहेत. शेतांमध्ये भात शेती बहरत आहे. ही भातशेती तयार होत असतानाच अनेक पक्षी शेतांच्या खाजणात माळरानांवर दिसून येत आहेत. यातच लक्ष वेधून घेणारा इवल्याशा आकाराचा असणारा सुगरण पक्षी घरटी बांधण्याच्या कामात व्यस्त झाला असून झाडांवर, फांद्यांमधून अनेक घरटी दिसू लागली आहेत.

सुगरणीचे हे घरटे पर्यावरणप्रेमी, छायाचित्रकार व पशू-पक्षी निरीक्षक, अभ्यासक यांना खुणावत आहेत. रायगडात तयार झालेल्या भातशेतीच्या खाजणाजवळ सुगरण पक्ष्यांनी आपल्या वसाहती उभारल्या असून एका एका झाडांवर पाच ते दहा घरटी टांगलेली दिसत आहेत. उत्तम कारागिरीचा नमुना म्हणून प्रसिद्ध असलेल्या सुगरण पक्ष्याची घरटी भातशेती परिसरात मुबलक प्रमाणात दिसत आहेत. विशिष्ट प्रकारचे गवत व भाताच्या पातीपासून तयार केलेली ही घरटी सुगरण नर पक्षाने बांधली आहेत. बाभळी व काटेरी झाडांवर ही घरटी मोठ्या प्रमाणात दिसत आहेत.

विशिष्ट प्रकारचा घरट्याचा आकार, त्याची रचना व कौशल्यपूर्ण केलेले विणकाम यामुळे सुगरणीचे घरटे अतिशय सुंदर दिसते. मे ते सप्टेंबर हा सुगरण पक्ष्यांचा विणीचा हंगाम असतो. नराने बांधलेल्या घरट्यात मादी आपली अंडी उबवून प्रजननाचे काम पूर्ण करते. एका वेळेस एक नर कमीत कमी चार ते दहा घरटी तयार करतो. अर्धवट बांधलेल्या घरट्यात मादी यावी म्हणून सुरेल आवाज काढून मादीला आकर्षित करतो. मादी सुगरण घरट्यात येऊन निरीक्षण करते. त्या घरट्यातील एखादे घरटे आवडले तरच ती नराला दादला म्हणून निवडते. एक वेळी मादी सुगरण दोन ते चार अंडी घालते. नराने अर्धवट बांधलेले घरटे ती स्वतः व नर पूर्ण करून पिलांना त्या घरट्यात ती वाढविते. अत्यंत कुशलतेने बांधली जाणारी ही घरटी भात खाजणात, महामार्गालगत मुबलक प्रमाणात दिसून येत आहेत. मुबलक खाद्य व अनुकूल परिस्थिती असल्याने एवढ्या मोठ्या प्रमाणात सुगरण पक्ष्यांची घरटी दिसत असल्याचे पक्षी निरीक्षक सांगतात. शेतीच्या प्रदेशात थव्याने हा पक्षी राहतो. भातपीक किटक व धान्य खातो. घरट्याला खालच्या बाजूने प्रवेशद्वार असते. खालून निमुळते, लांब बोगदा असलेले घरटे वर गोलाकार असते.



> **सुगरण पक्ष्याचा मे ते सप्टेंबर विणीचा हंगाम असतो. विणीच्या हंगामात नराचा रंग पिवळा होतो. एरव्ही नर व मादी दिसायला सारखी असतात. विणीच्या हंगामात नर तीन चार खोपे विणतो. त्यातील एक खोपा मादी पसंद करते व नंतर दोघे मिळून खोपा पूर्ण करतात. मादी दोन ते चार अंडी देते व अंडी उबवण्यापासून ते पिल्ली मोठी होण्यापर्यंत सर्व देखभाल करते.**
> **-राम मुंढे, पशू-पक्षी निरीक्षक**

सुगरण पक्षाच्या तीन जाती असून पट्टेरी सुगरण, काळ्या छातीची सुगरण व बाया सुगरण. भारत व शेजारील देशात हा पक्षी आढळतो. पक्षाचा आकार चिमणी सारखा असून मातकट काळा रंग असतो. बया, विवर म्हणजेच सुगरण पक्षी ओळखले जातात त्यांच्या विणकाम करून तयार केलेल्या घरट्यांमुळे, या पक्षांचा वीणीचा हंगाम मुख्यतः पावसाळी असतो. हे पक्षी थव्याने राहतात व नारळाच्या झाडांवर व इतर वृक्षांवरती संघटीत घरटी बांधतात.

भारताचे पहिले पक्षीशास्त्रज्ञ डॉ. सलीम अली यांनी रायगड जिल्ह्यातील किहीम येथे सुगरण पक्षांच्या विणीच्या हंगामाबद्दल अभ्यास केला होता. भातशेती बहरत आहे. काही पक्षांचा विणीचा हंगाम याच काळात सुरु होतो. विणीच्या हंगामा करिता सुगरण पक्षी घरटी बांधतात. हा पक्षी थव्याने राहतो. सुयोग्य व अनुकूल परिसर असल्याने मोठया प्रमाणात सुगरण पक्षाची घरटी दिसत आहेत. जैवविविधता व वन्य पक्षांसाठी व अभ्यासकांसाठी ही चांगली बाब आहे. त्यांच्यासाठी पर्वणी मानली जात आहे.

# भारताची वर्ल्डकप फायनलमध्ये धडक

## ऑस्ट्रेलियावर शानदार विजय, जेमिमा ठरली विजयाची शिल्पकार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



जेमिमा रॉड्रीग्ज आणि हरमनप्रीत कौरच्या वादळी फटकेबाजीच्या जोरावर भारताने ऑस्ट्रेलियावर पाच विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. यासह टीम इंडिया महिला विश्वचषक २०२५च्या अंतिम फेरीत पोहचली आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात महिला विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीतील अटीतटीचा सामना खेळवला गेला. दोन्ही संघांनी शेवटपर्यंत सामन्यात कडवी झुंज दिली. भारताकडून जेमिमा रॉड्रीग्जने उत्कृष्ट शतकी खेळी केली आणि कर्णधार हरमनप्रीत कौरच्या साथीने संघाला विजय मिळवून दिला. भारताच्या या ऐतिहासिक विजयानंतर जेमिमा, हरमनप्रीतसह संपूर्ण संघाला अश्रू अनावर झाले.

ऑस्ट्रेलियाने सेमीफायनल सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि ३३८ धावांची मोठी धावसंख्या उभारली. ऑस्ट्रेलियाकडून फिबी लिचीफिल्डने शतक झळकावत ९३ चेंडूत १७ चौकार व तीन षटकारांसह ११९ धावांची खेळी केली आणि संघांच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. एलिस पेरीने ७७ धावांची, बेथ मुनीने २४ धावांची खेळी केली, तर एश्ले गार्डनरने ६३ धावांची उत्कृष्ट खेळी केली, पण अखेरच्या षटकांमध्ये भारताने झटपट विकेट्स घेतल्याने ऑस्ट्रेलिया अधिक धावा करू शकला नाही. भारताकडून श्री चरणी, दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या, तर क्रांती, अमनज्योत व राधा यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

प्रत्युत्तरात ३३९ धावांचा पाठलाग करताना भारताची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. शफाली वर्मा १० धावा आणि स्मृती मानधना २४ धावा करत बाद झाली. यानंतर जेमिमा रॉड्रीग्ज व कर्णधार हरमनप्रीत कौर यांनी १६७ धावांची भागीदारी रचत भारतासाठी या सामन्यात मोठी भूमिका बजावली, तर कर्णधार हरमनप्रीत कौरने ८८ चेंडूत १० चौकार आणि दोन षटकारांसह ८९ धावांची खेळी केली, तर दीप्ती शर्मा २४ धावा करत माघारी परतली.

रिचा घोषने १६ चेंडूत २६ धावांची झटपट खेळी करत बाद झाली. जेमिमा रॉड्रीग्जने १३४ चेंडूत १४ चौकारांसह १२७ धावांची नाबाद खेळी करत संघाला विजय मिळवून देत माघारी परतली. यासह टीम इंडियाने ४८.३ षटकांत पाच बाद ३४१ धावा केल्या.

भारतीय संघाने वनडे क्रिकेटमधील सर्वात मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करत ऐतिहासिक विजय मिळवला. या ऐतिहासिक विजयासह टीम इंडिया आठ वर्षांनी महिला विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात पोहचली आहे.



## कराटे प्रशिक्षण शिबिर आणि ब्लॅक बेल्ट परीक्षा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाच्या वतीने बोर्डी डहाणू येथे कराटे प्रशिक्षण शिबिर व ब्लॅक बेल्ट परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रायगड, ठाणे, मुंबई उपनगर, पालघर, वसई, विरार आदी ठिकाणाहून एकूण १२७ कराटेपटू सहभागी झाले होते.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना कराटे, किकबॉक्सिंग, बॉक्सिंग, वूशु, ज्यूडो आदी खेळाचे प्रशिक्षण देण्यात आले तसेच जलतरण, रायफल शूटिंग, कमांडो ट्रेनिंग याचेही प्रशिक्षण देण्यात आले.

**खेळाडूंचे यश**

महाराष्ट्र पोलीस कमांडो ट्रेनर प्रदीप मोहिते, प्रवीण पाटील, अवंतिका पाटील, पियुष सदावर्ते, प्रशांत गांगुर्डे, निलेश भोसले, प्रतिक कारंडे यांनी प्रशिक्षण दिले तसेच ब्लॅक बेल्ट आणि डिग्री उत्तीर्ण विद्यार्थ्यांना युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर यांच्या हस्ते ब्लॅक बेल्ट व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून क्षमा कवळी उपस्थित होत्या. सर्व उत्तीर्ण ब्लॅक बेल्टसचे युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

**परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी**

वीर मुंबरकर, तेजल भोईटे, प्रज्वल दरेकर, सार्थक भगत, दिया भगत, स्वरंगी हुद्दार, मानव पारचे, फिरोज अन्सारी, अनिकेत डुशिंग, अजय सत्रे, सोहम पडवळ, समीक्षा परब, मेघना पाटील, विवेक रावल, अथर्व पंत, तेजस मोहिते, पूर्वा गायकवाड; १ डिग्री ब्लॅक बेल्ट शिवप्रेम जुवले, प्रथम बहिरा, ओम पिसाळ, अनिरुद्ध खरात, वेदांत कायंदेकर; ४ डिग्री ब्लॅक बेल्ट हरमेश सारंगकर.

## दिग्गज क्रिकेटर्सकडून भारतीय महिला संघावर कौतुकाचा वर्षाव

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ऐतिहासिक विजयासह महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेच्या फायनलमध्ये प्रवेश केला आहे. या विजयानंतर भारतीय संघावर कौतुकाचा वर्षाव होतोय.

गतविजेत्या ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करताना ३३८ धावा केल्या होत्या, पण सर्वाधिक वेळा ही स्पर्धा जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियाला या धावासंख्येचा बचाव करता आला नाही. भारतीय महिला संघाने नऊ चेंडू आणि पाच विकेट्स राखून दिमाखात फायनल गाठली. हरमनप्रीत कौरच्या ८९ धावांच्या खेळीसह जेमिमा रॉड्रिग्जच्या १२७ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर भारतीय संघाने विक्रमी विजय नोंदवत पहिली वहिली वर्ल्डकप स्पर्धा जिंकण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

भारतीय महिला संघाच्या ऐतिहासिक विजयानंतर देशभरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भारताच्या 'वूमन इन ब्लू' च्या या दमदार कामगिरीनंतर दिग्गज क्रिकेटपटूंनी महिला संघाच्या कामगिरीवर आपल्या भावना व्यक्त करत संघातील खेळाडूंवर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. सचिन तेंडुलकर, युवराज सिंगसह क्रिकेटच्या मैदानातील दादा अर्थात सौरव गांगुली, भारतीय पुरुष संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, चेस मास्टर विराट कोहली तसेच दक्षिण आफ्रिकेचा महान फलंदाज ए.बी. डीव्हिलियर्स यांनी ऑस्ट्रेलियावरील या ऐतिहासिक विजयाबद्दल भारतीय संघाचे अभिनंदन केले.

**सचिनकडून जेमिमा-हरमनप्रीतला शाब्बासकी!**

अप्रतिम विजय! शाब्बास जेमिमा रॉड्रिग्ज आणि हरमनप्रीत कौर. तुम्ही दोघींनी संघाला विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला. गोलंदाजी श्री चरणी आणि दिप्तीने कमाल केली. तिरंगा असाच उंचावत ठेवा, अशा शब्दांत मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने भारतीय महिला संघाला फायनलमध्ये प्रवेश मिळवल्याबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.

> *भारतीय संघाने धावांचा पाठलाग करताना मिळवलेला विजय हा अविश्वसनीय आहे. सर्वात बलाढ्या प्रतिस्पर्धी संघाच्या विजयाचा सिलसिला खंडीत केल्याबद्दल टीम इंडियाचे खूप अभिनंदन!*
>
> **-ए.बी. डीव्हिलियर्स,**
> दक्षिण आफ्रिका

## ऐतिहासिक विजयानंतर जेमिमाने केला मानसिक तणावावर खुलासा



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताने आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारलेला क्षण केवळ जेमिमा रॉड्रिग्सच्या विक्रमी शतकामुळेच नाही, तर त्यानंतर आई-वडिलांना तिने मारलेल्या भावनिक मिठीमुळेही स्मरणात राहील. या ऐतिहासिक विजयानंतर जेमिमाने मानसिक तणावावर मोठा खुलासा केला आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात भारताला विजय मिळवून दिल्यानंतर जेमिमा रॉड्रिग्ज भावुक झाली आणि तिला आपले अश्रू आवरता आले नाहीत. जेमिमा म्हणाली, मागच्या वेळी मला विश्वचषक संघातून वगळण्यात आले होते. या वेळी मी आत आले आणि विचार केला, ठीक आहे, मी प्रयत्न करेन. मी चांगल्या फॉर्ममध्ये होते, पण एकामागून एक गोष्टी घडत राहिल्या आणि मी काहीही नियंत्रित करू शकत नव्हतो. माझ्याभोवती अद्‌भूत लोक होते ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला. या संपूर्ण दौऱ्यात मी जवळजवळ दररोज रडत होते. मला मानसिकदृष्ट्या बरे वाटत नव्हते, मी खूप काळजीत होते. मग वगळणे हे एक आव्हान होते, परंतु मला वाटते की मला फक्त उपस्थित राहावे लागले आणि देवाने बाकीची काळजी घेतली.

जेमिमाने हेदेखील सांगितले की तिला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला जायचे आहे, हे तिला मैदानात जाण्याच्या फक्त पाच मिनिटे आधी कळले. तिचा हा अविस्मरणीय विजय क्रिकेटपेक्षाही अधिक होता. तो श्रद्धा, कुटुंब आणि समाधानाचा एक अविस्मरणीय अनुभव होता.














| अ. क्रं | पाणी करावरील शास्ती अभय योजनेचा कालावधी | शास्ती माफीची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | ०१/११/२०२५ ते ३०/११/२०२५ | १००% |
| २ | ०१/१२/२०२५ ते १५/१२/२०२५ | ७५% |

**सदर योजनेचा लाभ खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे.**

शास्ती अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी थकबाकीदाराने पाणी कराचा संपूर्ण भरणा एकाचवेळी करणे आवश्यक राहील. सदर योजना हि वरील कालावधी करिताच मर्यादित राहील .

मालमत्ता कर भरणा करण्याकरिता Karmitra PMC App & Panvel Connect App डाउनलोड करा.

PANVEL CONNECT

QR Code स्कॅन करा आणि पाणी कर भरा


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com